संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

Hero GIFT Grand Indian Festival of Trust
तडजोड नाही, फक्त नवीन HF-Deluxe
फेस्टिव्ह एक्स शोरूम किंमत* ₹69,868* ₹64,868*
(₹4000* कॅश डिस्काउंट सोबत)
कमी डाउन पेमेंट ₹1999* | EMI ₹3999* | व्याजदर 5.99%* | निवडक कार्डसवर कॅशबॅक ₹5000* | 98980 51581

रजि नं. ११४३९–५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर,मंगळवार दि. २९.१०.२०२४ | अंक नं. २०३ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020

यंदा दिवाळी राजपाल सोबत
खरेदी मस्त..बक्षिसे जबरदस्त!
खरेदी करा आणि जिंका 31 दिवस 21 लाखांची बक्षिसे*
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

शुध्द आरोग्यदायी ड्रायफ्रुटस्
काजु | किसमिस | खोबरं | केर सांगरी | मेलन सीडस्
बदाम | काळा मनुका | गाईचे तुप | कागदी बदाम | खारीक खोबरं मिक्स
अंजीर | जरदाळू | धावडा डिंक | सनफ्लॉवर सीडस् | खारा काजू
अक्रोड | मखाना | मामरा बदाम | चिया सीडस् | मसाला काजू
खारा पिस्ता | खारीक | खजुर | पमकीन सीडस् | खारा बदाम
ड्राईड पायनापल, मँगो, किवी, स्ट्रॉबेरी, पोमेलो, क्रॅनबेरी, मिक्स फ्रुट
भूमी एजन्सीज सुकामेवा आणि मसाल्याचे ठोक व किरकोळ विक्रेते
मिक्स खडा मसाला उपलब्ध
आनंद कॉम्प्लेक्स, दाळ मंडई, अ.नगर. M. 9011163452

॥ श्री ॥
दिवाळी फराळ
५१ वर्षांची परंपरा जपत शुद्ध, पौष्टिक, पारंपारिक व घरगुती पद्धतीने बनविलेले फराळाचे पदार्थ..
सच्चिदानंद केटरर्स
प्रोप्रा. नरेंद्र कुलकर्णी
9822771199, 9420796195
शमी गणपती मंगल कार्यालय, दिल्लीगेट, अ.नगर

स्नेह भोज स्वाद दिल से दिल तक।
बारसे, डोहाळे जेवण, साखरपुडा, गेट टू गेदर
अश्या छोटेखानी समारंभासाठी
परफेक्ट हॉल आणि सोबत
स्नेहभोजची रुचकर थाळी सुद्धा...
बजेटमध्ये सुटसुटीत कार्यक्रम
रुधिरा टॉवर्स, झोपडी कॅन्टीन, सावेडी, अहमदनगर
86 98 8080 88

## एमआयडीसीतील कंपनीतून १४ लाखांच्या साहित्याची चोरी

नगर – एमआयडीसी परिसरात बंद असलेल्या कंपनीतून सुमारे १४ लाखांचे साहित्य अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी एमआयडीसी पोलिस ठाण्यात सोमवारी (दि.२८) गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत कंपनीचे मालक वल्लभ बिहारीलाल भराडिया (वय ४७, रा. गांजेगल्ली, गंज बाजार, नगर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी भराडिया यांची एमआयडीसी परिसरात डी – ६६ मध्ये कंपनी आहे. या कंपनीत विविध उपकरणे बनविण्यात येत होती. त्यासाठी मोठ्या प्रमाणात पितळी धातूचे कच्चे साहित्य वापरले जायचे. त्यामुळे त्यांनी साहित्याचा साठा करून ठेवलेला होता.

मात्र सध्या कंपनी बंद आहे. या कंपनीच्या खिडकीचे ग्रील तोडून अज्ञात चोरट्यांनी सुमारे १३ लाख ९३ हजारांचे पितळी धातूचे साहित्य चोरून नेले आहे. ही बाब निदर्शनास आल्यावर त्यांनी एमआयडीसी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली.

या फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञात चोरट्यांच्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३३१ (३),(४), ३०५ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

## सिव्हील हॉस्पिटलच्या डॉक्टर वसाहतीतून चोरी

नगर – सिव्हील हॉस्पिटलमधील डॉक्टर्स व इतर कर्मचाऱ्यांच्या वसाहती मधील एका क्वार्टरमध्ये अज्ञात चोरट्यांनी भरदिवसा घरफोडी करत रोख रकमेसह सोन्याचे दागिने चोरून नेल्याची घटना सोमवारी (दि.२८) दुपारी घडली.

याबाबत योगेश ज्ञानदेव दिवटे (वय ३७, रा.डॉक्टर्स क्वार्टर, पत्रकार चौक) यांनी तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे क्वार्टर क्र.३ मध्ये राहात असून त्यांच्या घरातून अज्ञात चोरट्यांनी रोख रकमेसह सोन्याचे दागिने असा ४८ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला. सोमवारी दुपारी ४ च्या सुमारास ही बाब निदर्शनास आली. त्यानंतर त्यांनी तोफखाना पोलिसांना माहिती दिली. ही माहिती मिळाल्यावर पोलिस निरीक्षक आनंद कोकरे यांनी पथकासह घटनास्थळी भेट देत पाहणी केली. याबाबत दिवटे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्यांविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३३१ (३), ३०५ (अ) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आकर्षक पॅकींग मध्ये
बकलावा गिफ्ट बॉक्स
ड्रायफ्रुट चॉकलेट बॉक्स
ड्रायफ्रुट बॉक्स
मिक्स मिठाई
स्पे. बर्फी मिक्स
फराळ हॅम्पर
शुगर फ्री मिठाई
आता चाणक्य चौकात सुद्धा...
Since 1910 बम्बईवाला मिठाईयाँ एवम् फरसाण
स्वीटस् । नमकीन । ड्रायफ्रुट । दिल्ली चाट । फास्टफुड
कापड बाजार, अ.नगर. | चाणक्य चौक, बुरूडगाव रोड, अ.नगर.
मो. : 9822041013 / 9623882710

चला, चला, चला अहमदनगर शहरात आपल्या भेटीस घेऊन आलोय...
खास दिपावलीसाठी नवीन व्हरायटीज सह नवीन स्टॉक
खादी महोत्सव फॅक्टरी सेल
रूबाबदार खादी व लिनन शर्ट
महाराष्ट्राची शान खादी उत्सव
फॅशनच्या दुनियेतील तरुणाईची नवीन पसंत
खादी शर्ट, कुर्ता पायजमा अजून भरपूर व्हरायटीज सह
आता प्रत्येकाला आवडेल खादी शर्ट
खादी हाफ शर्ट — ५ खादी हाफ शर्ट फक्त रु.1000/-
खादी फुल शर्ट — ४ खादी हाफ शर्ट फक्त रु.1000/-
स्पेशल खादी ज्युट हाफ शर्ट — फक्त रु. 300/- व अधिक
स्पेशल खादी ज्युट फुल शर्ट — फक्त रु. 350/- व अधिक
हाफ कुर्ता, जॅकेट, पठाणी, कुर्ते-पायजमे, फुल शर्ट, संग्राम कुर्ते, व्हाईट लिनन शर्ट
स्पेशल खादी कुर्तीज — फक्त रु. 350/- व अधिक
स्पेशल खादी अनारकली — फक्त रु. 450/- व अधिक
नाईट पायजमा — फक्त रु. 350/- व अधिक
खादी टॉवेल — फक्त रु.100/-, 200/-, 250/- व अधिक
तर मग विचार करताय, या लवकर लवकर आणि घेऊन जा...
श्री तुळजाभवानी खादी भांडार
स्थळ अहमदनगर जिल्हा वाचनालय (हॉल) दुसरा मजला, नेता सुभाष चौक, चितळे रोड, अहमदनगर.
सुरज - मो. 8208387715

HONDA
Shine 100
5% कॅशबॅक ₹5000# पर्यंत
किमान डाऊन पेमेंट ₹1100*
Special offer 10 Years Warranty
Valid till 31st Oct. '24
₹64900 एक्स-शोरूम किंमत (महाराष्ट्र)
व्हिडिओचा आनंद घेण्यासाठी, कृपया QR Code स्कॅन करा.
IDFC FIRST Bank | HDFC BANK | TATA CAPITAL | Chola
BOOK ONLINE NOW! CLICK BOOK RELAX
रिरोन्सी होंडा
अहमदनगर – सावेडी, फोन: 0241 - 2422768 / 70 / 71
राहुरी – शेटे स्टेट, सूर्या पेट्रोलपंपा जवळ – 8380079846 / 47
सबलोक होंडा
अहमदनगर – सर्जेपुरा, मो : 7276041111,
कायनेटिक चौक – 7276051111

दिवाळीनिमित्त फ्रेश स्टॉक
महावीर मॉल...
स्वस्त परंतु चांगले कपडे खरेदी करणाऱ्या ग्राहकांनीच कृपया मॉलला भेट द्यावी.
लहान मुलांचे फॅन्सी जोधपूरी, सूट, इंडो वेस्टर्न, कुर्ता, मोदी जॅकेट ड्रेस, इंपोर्टेड टीशर्ट शर्ट, अरमानी पॅंट
सर्व साईजमध्ये उपलब्ध. (ब्लॅंकेट, बेडशीटमध्ये ४० नमुने)
मार्केट पेक्षा वेगळ पाहिजे तर मार्केट पेक्षा वेगळ्या ठिकाणी यावे लागेल.
अधिक माहितीसाठी भेट द्या..
श्री महावीर कलेक्शन
मारुती मंदिरा समोर, मर्चंट बँक जवळ, मार्केटयार्ड, अ.नगर. Mo. 98222 52001

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## दिव्यांच्या ज्योतीसम आत्मज्योतीचा अनुभव घ्या

दिवाळीचे आनंददायक, उत्साहवर्धक आणि प्रसन्नदायक वातावरण सर्वत्र आहे. आध्यात्मिक अधिष्ठाण लाभलेला दीपोत्सव तर सणांचा राजा आहे.

या दीपोत्सवात प्रत्येक जण अंतर्बाह्य व आनंदी असतो. दिव्यांच्या आरासाने अंधःकारमय सृष्टीला नवचैतन्याने सुंदरतेचा साज मिळतो.

आता थोडसं तत्त्वज्ञान, आध्यात्मिकदृष्ट्या विचार करू या. तुम्ही कधी पणत्यांकडे खूप वेळ पाहतो का? किंवा दिव्यांची ज्योत पाहून आंतरिक आनंद अन् प्रसन्नता मिळते का? अतीव प्रसन्नतेची अनुभूती येतेय का?

सामान्यतः दिवा, पणती, समईची शुभ्र शांत ज्योत, वात पाहिल्यावर प्रत्येकालाच आनंद मिळतो. म्हणूनच यानिमित्ताने वाटते की या दिव्यांच्या ज्योतीने जर एवढा आनंद, मोठी प्रसन्नता वाटते तर आपल्या हृदयी वसलेल्या अंतरीच्या आत्मज्योतीचा अनुभव घेता आला तर?

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन
संकलन : "मुसाफिर"-९८२२०२०६९१

दिव्याची ज्योत पाहतांना आत्म ज्योतीच्या प्रचितीचा आनंद घेता येतो. फक्त त्यासाठी घरादाराप्रमाणे मनातील, हृदयातील जळमटे साफ करून निर्मळ, विधायकतेची रांगोळी सजवून उंच विचारांचा आकाशकंदील लावावा लागेल. शुद्ध, सात्त्विक विचारांच्या फराळाने व सर्वोत्तम गुणांची आतषबाजी करता आली तर खरी आंतरिक दिवाळी साजरी करता येईल. आत्मज्योतीचा आनंद देणारी तुमच्या आशा आकांक्षांना पूर्णत्व येणारी दीपावलीच्या आपणास शुभकामना.



**किशोर गांधी/मुसाफिर**

# जिल्ह्यात विधानसभा निवडणूक आचारसंहितेच्या उल्लंघनाबाबत सी व्हिजिल ॲपवर नागरिकांनी तक्रार करावी : जिल्हाधिकारी

नगर - जिल्ह्यात विधानसभा निवडणुकीसाठी आचारसंहिता लागू असून निवडणूक कालावधीत आचारसंहितेचे उल्लंघन होत असल्यास सर्वसामान्य मतदार, नागरिकांनी सी व्हिजिल ॲपद्वारे तक्रार नोंदवावी असे आवाहन जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी केले आहे. या ॲपवर दाखल होणाऱ्या तक्रारींवर १०० मिनिटांत पहिली कार्यवाही करण्यात येत असल्याचेही त्यांनी नमूद केले आहे.

आदर्श आचारसंहितेच्या उल्लंघनाची तक्रार करणे आता पूर्वीपेक्षा अधिक सुलभ झाले आहे. आचारसंहिता उल्लंघनाची तक्रार किंवा माहिती निवडणूक आयोग आणि जिल्हा प्रशासनापर्यंत पोहोचवण्यासाठी भारत निवडणूक आयोगाने सी व्हिजिल ॲप विकसित केले आहे. या मोबाईल ॲपद्वारे मतदारांना आता थेट आयोगाकडे तक्रार करता येणार आहे. या सी व्हिजिल ॲपवर तक्रार प्राप्त होताच तातडीने त्यावर कारवाई केली जाते. तक्रारदाराचे नाव गोपनीय ठेवले जाते.

सी व्हिजिल ॲप अँड्रॉइड आणि आयओएस डिव्हाइसवर डाऊनलोड करण्यासाठी उपलब्ध आहे. उल्लंघनाची तक्रार करण्यासाठी, वापरकर्त्यांनी फक्त ॲप उघडणे, उल्लंघनाचा प्रकार निवडणे आणि घटनेचे तपशिल, स्थान, वेळ आणि छायाचित्रे किंवा व्हीडिओ प्रदान करणे आवश्यक आहे. ॲप वापरकर्त्यांना त्यांच्या तक्रारींच्या प्रगतीचा मागोवा घेता येणार आहे.

ॲपचा वापर करण्यासाठी एन्ड्रॉईड मोबाईलमधील गुगल प्ले स्टोर आणि आयफोन मधील ॲप स्टोर या ॲपमध्ये जावून सी व्हिजिल (cVIGIL) सर्च करावे. त्यानंतर ॲप डाऊनलोड करावे. त्यानंतर ॲप उघडून मोबाईल क्रमांक, पत्ता, मतदारसंघ समाविष्ट करुन खाते तयार करावे. आपल्याला ज्या उल्लंघनाची तक्रार करायची आहे ते निवडा आणि स्थळ, वेळ आणि छायाचित्रे किंवा व्हीडिओसह घटनेचे तपशील टाकून तक्रार सबमिट करावी.

सी व्हिजिल ॲप जिल्हा नियंत्रण कक्ष, निवडणूक निर्णय अधिकारी आणि भरारी पथकाशी जागरूक नागरिकांना जोडते. या ॲपच्या अचूकतेसाठी पमधून फक्त लाईव्ह लोकेशनवर आधारित फोटो, व्हीडिओ घेतले जातात. जेणेकरुन भरारी पथक, स्थिर संनिरीक्षण चमुंना वेळेत कार्यवाही करणे शक्य होईल, असे जिल्हा निवडणूक प्रशासनातर्फे कळविण्यात आले आहे.

## पारनेर व अहमदनगर मतदार संघासाठी निवडणूक निरीक्षकांची नियुक्ती

नगर - भारत निवडणूक आयोगाने पारनेर आणि अहमदनगर विधानसभा मतदार संघासाठी ताई के (भा.प्र.से.) यांची यांची निवडणूक निरीक्षक म्हणून नियुक्ती केली आहे. निवडणूक निरीक्षक ताई के यांच्याशी ८८३०९३६३६२ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधता येणार आहे. त्यांचा मुक्काम शासकीय विश्रामगृह, अहिल्यानगर येथे असणार आहे.

निवडणूक निरीक्षक यांचे संपर्क अधिकारी म्हणून जागतिक बँक प्रकल्प विभागाचे सहायक अभियंता संदिप कुंभार यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांचा भ्रमणध्वनी क्रमांक ९५५२१३४७८५.

## जिल्ह्यात विधानसभा निवडणुकीसाठी पोलीस निवडणूक निरीक्षक म्हणून नागेन्द्रनाथ त्रिपाठी यांची नियुक्ती

नगर - भारत निवडणूक आयोगाने जिल्ह्यात विधानसभा निवडणुकीसाठी नागेन्द्रनाथ त्रिपाठी (आय.पी.एस.) यांची पोलीस निवडणूक निरीक्षक म्हणून नियुक्ती केली आहे. श्री. त्रिपाठी यांच्याशी ९२२६०१२६५४ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधता येणार आहे. त्यांचा मुक्काम वसंतकिर्ती पोलिस विश्रामगृह सावेडी, अहिल्यानगर येथे असणार आहे.

निवडणूक निरीक्षकांचे संपर्क अधिकारी म्हणून सहायक पोलिस निरीक्षक युवराज आठरे यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांचा भ्रमणध्वनी क्रमांक ९८५०२९८४८२ असा आहे.

## शिर्डी व कोपरगाव मतदारसंघासाठी निवडणूक निरीक्षकांची नियुक्ती

नगर - भारत निवडणूक आयोगाने शिर्डी आणि कोपरगाव विधानसभा मतदार संघासाठी कविथा रामू (भा.प्र.से.) यांची निवडणूक निरीक्षक म्हणून नियुक्ती केली आहे. निवडणूक निरीक्षक कविथा रामू यांच्याशी ८८३०७८४६५५ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधता येणार आहे.

श्रीमती रामू यांची शासकीय विश्रामगृह शिर्डी येथे दुपारी १२ ते १ या वेळेत भेट घेता येईल. निवडणूक निरीक्षक यांचे संपर्क अधिकारी म्हणून सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता श्रीनिवास वर्पे यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांचा भ्रमणध्वनी क्रमांक ९४२३७८७३३४.

## श्रीगोंदा व कर्जत-जामखेड मतदारसंघासाठी निवडणूक निरीक्षकांची नियुक्ती

नगर - भारत निवडणूक आयोगाने श्रीगोंदा आणि कर्जत-जामखेड विधानसभा मतदारसंघासाठी डी. रथ्ना (भा.प्र.से.) यांची निवडणूक निरीक्षक म्हणून नियुक्ती केली आहे. निवडणूक निरिक्षक डी. रथ्ना यांच्याशी ९४२१०६०७१९ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधता येणार आहे. त्यांचा मुक्काम शासकीय विश्रामगृह श्रीगोंदा येथे असणार आहे. निवडणूक निरीक्षक यांचे संपर्क अधिकारी म्हणून श्रीगोंदाचे उपविभागीय जलसंधारण अधिकारी प्रज्वल जायभाये यांची नियुक्ती श्रीगोंदा करण्यात आली असून त्यांचा भ्रमणध्वनी क्रमांक ९५६३३६१२१२ असा आहे. तसेच कर्जत तहसिल कार्यालयातील पुरवठा निरीक्षक वृषाली अजिनाथ जाधव यांचीही नियुक्ती करण्यात आली असून त्यांचा भ्रमणध्वनी क्रमांक ७३८७४०६९७२.

## श्रीरामपूर व नेवासा मतदारसंघासाठी निवडणूक निरीक्षकांची नियुक्ती

नगर - भारत निवडणूक आयोगाने श्रीरामपूर आणि नेवासा विधानसभा मतदार संघासाठी अरुण कुमार (भा.प्र.से.) यांची निवडणूक निरीक्षक म्हणून नियुक्ती केली आहे. निवडणूक निरीक्षक अरुण कुमार यांच्याशी ९२०९५८८९२१ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधता येणार आहे. त्यांचा मुक्काम शासकीय विश्रामगृह, शिर्डी येथे असणार आहे.

निवडणूक निरीक्षक यांचे संपर्क अधिकारी म्हणून नगरपालिकेचे मुख्याधिकारी मच्छिंद्र घोलप यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांचा भ्रमणध्वनी क्रमांक ८४२५९२४४३३.

## शेवगाव व राहुरी विधानसभा मतदारसंघासाठी निवडणूक निरीक्षकांची नियुक्ती

नगर - भारत निवडणूक आयोगाने शेवगाव, आणि राहुरी विधानसभा मतदार संघासाठी श्रीमती रंजीता (भा.प्र.से.) यांची निवडणूक निरीक्षक म्हणून नियुक्ती केली आहे. निवडणूक निरीक्षक श्रीमती रंजीता यांच्याशी ९२०९५९५४३८ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधता येणार आहे. त्यांचा मुक्काम महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी येथील विश्रामगृहामध्ये असणार आहे.

निवडणूक निरीक्षक यांचे संपर्क अधिकारी म्हणून मुळा पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंता, सायली पाटील, उप कार्यकारी अभियंता धनश्री शिंदे यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांचा भ्रमणध्वनी क्रमांक ८४८५८३४५०५ असा असल्याचे जिल्हा निवडणूक प्रशासनातर्फे कळविण्यात आले आहे.

## अकोले आणि संगमनेर मतदारसंघासाठी निवडणूक निरीक्षकांची नियुक्ती


नगर - भारत निवडणूक आयोगाने अकोले आणि संगमनेर विधानसभा मतदार संघासाठी हौलीनलाल गौईटे (भा.प्र.से.) यांची निवडणूक निरीक्षक म्हणून नियुक्ती केली आहे. निवडणूक निरीक्षक हौलीनलाल गौईटे यांच्याशी ८७८८४९१६४१ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधता येणार आहे. त्यांचा मुक्काम शासकीय विश्रामगृह संगमनेर येथे असणार आहे.

निवडणूक निरीक्षक यांचे संपर्क अधिकारी म्हणून अपर प्रवरा सब डिव्हीजनचे कार्यकारी अभियंता प्रदिप हापसे यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांचा भ्रमणध्वनी क्रमांक ७३५००७८८७७, ९९७०६२४०३५.

# अहमदनगर मतदारसंघातून अखेरच्या दिवशी संग्राम जगताप, अभिषेक कळमकर, सचिन डफळ, प्रा. शशिकांत गाडे, भगवान फुलसौंदर, किरण काळे, सुवर्णा कोतकर यांचे उमेदवारी अर्ज दाखल



अहमदनगर विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी सुधीर पाटील यांच्याकडे दाखल करताना राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अभिषेक कळमकर. समवेत दादाभाऊ कळमकर, विक्रम राठोड, ओंकार सातपुते आदी.



अर्ज दाखल करताना काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष किरण गुलाबराव काळे. समवेत विक्रम राठोड, मनोज गुंदेचा, अनिस चुडीवाला, विलास उबाळे, सुनिल क्षेत्रे आदी.



अर्ज दाखल करताना शिवसेनेचे भगवान फुलसौंदर. समवेत प्रा. शशिकांत गाडे, विक्रम राठोड, बाळासाहेब बोराटे, दत्ता जाधव आदी.



अर्ज दाखल करताना शिवसेनेचे प्रा. शशिकांत गाडे. समवेत भगवान फुलसौंदर, संभाजी कदम, विक्रम राठोड, दत्ता जाधव आदी.



अहमदनगर विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी सुधीर पाटील यांच्याकडे दाखल करताना मनसेचे सचिन डफळ. समवेत विनोद काकडे आदी.



अहमदनगर विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी सुधीर पाटील यांच्याकडे दाखल करताना कुणाल सुनील भंडारी

नगर - अहमदनगर शहर विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या अखेरच्या दिवशी (२९ ऑक्टोबर) अनेक प्रमुख इच्छुक उमेदवारांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत.



अर्ज दाखल करताना शिवसेनेचे बाळासाहेब मारुती बोराटे. समवेत प्रा. शशिकांत गाडे, अशोक दहिफळे, संभाजी कदम, संग्राम कोतकर आदी.



अर्ज दाखल करताना भाजपचे वसंत हस्तीमल लोढा. समवेत मिलिंद गंधे, दिगंबर गेंट्याल, संजय वल्लाकट्टी आदी.



अर्ज दाखल करताना माजी उपमहापौर सुवर्णाताई संदीप कोतकर.

अहमदनगर मतदारसंघातून संग्राम अरुणकाका जगताप (२ अर्ज, नॅशनलिस्ट काँग्रेस पार्टी, अपक्ष), सुनील सुरेश फुलसौंदर (अपक्ष), उत्कर्ष राजेंद्र गिते (अपक्ष), सचिन बबनराव राठोड (अपक्ष), मदन संपत आढाव (अपक्ष), किरण नामदेव काळे (अपक्ष), मंगल विलास भुजबळ (इंडियन नॅशनल काँग्रेस, २ अर्ज), गणेश बबन कळमकर (अपक्ष), विजयकुमार गोविंदराम ठुबे (अपक्ष), शोभा परमेश्वर बडे (अपक्ष), बारसे प्रतिक अरविंद (अपक्ष), उमाशंकर शामबाबू यादव (बसपा), भगवान प्रल्हाद फुलसौंदर (अपक्ष), चंद्रशेखर मारुती बोराटे (३ अर्ज, अपक्ष, शिवसेना, राष्ट्रवादी शरचंद्र पवार पक्ष), कोतकर सुवर्णा संदीप (अपक्ष), शशिकांत माधवराव गाडे (अपक्ष), महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे सचिन चंद्रभान डफळ, वसंत हस्तीमल लोढा (भाजप, अपक्ष २ अर्ज), वंचित बहुजन आघाडीचे हनिफ जैनुद्दीन शेख, नॅशनलिस्ट काँग्रेस पार्टीचे अभिषेक बाळासाहेब कळमकर, सैनिक समाज पार्टीचे शिवाजीराव वामन डमाळे, नॅशनलिस्ट काँग्रेस पार्टीचे संग्राम अरुण जगताप (२ अर्ज), इंडियन नॅशनल काँग्रेसचे किरण गुलाबराव काळे (२ अर्ज), गोरक्षनाथ जगन्नाथ दळवी, विजयकुमार गोविंदराव ठुबे, प्राची अभिषेक कळमकर, अनिरुद्ध अरविंद भऊरकर, कुणाल सुनिल भंडारी, धनेश काशीबाई पोपटलाल गांधी यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत.

नगर शहर मतदारसंघातून अखेरच्या दिवसापर्यंत ७९ जणांनी १४३ उमेदवारी अर्ज घेतले होते. पैकी अखेरच्या मुदतीत ३७ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. शेवटच्या दिवशी मंगळवारी (दि.२९) २९ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत.

## अभिषेक कळमकरच महाविकास आघाडीचे उमेदवार राहणार

### कुठलाही बदल होणार नाही, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र फाळके यांचे स्पष्टीकरण

नगर - नगर शहर विधानसभा मतदार संघात महाविकास आघाडीच्या जाहीर केलेल्या उमेदवारामध्ये कोणताही बदल नाही. राष्ट्रवादी काँग्रेसचे अभिषेक कळमकर हेच उमेदवार राहणार असल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र फाळके यांनी दिली आहे. महाविकास आघाडीत नगर शहर मतदार संघाची जागा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला सुटल्यावर या ठिकाणी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी अभिषेक कळमकर यांना उमेदवारी जाहीर केलेली आहे. त्यानंतर शिवसेना उद्धव ठाकरे गट आक्रमक झालेला आहे. गेल्या २ दिवसात शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी बैठका घेत उमेदवारीवरून उघड नाराजी व्यक्त केलेली आहे. सोमवारी (दि.२८) दुपारी झालेल्या बैठकीत जिल्हा प्रमुख प्रा.शशिकांत गाडे, माजी महापौर भगवान फुलसौंदर, माजी नगरसेवक बाळासाहेब बोराटे यांनी उमेदवारी अर्ज भरण्याचा निर्णय घेतला होता. त्याप्रमाणे या तिघांनी मंगळवारी (दि.२९) अर्ज दाखल केले आहेत. राज्याने केलेली चूक सुधारून महाविकास आघाडीकडून एक सक्षम उमेदवार देण्यात येईल असेही प्रा.गाडे यांनी जाहीर केले होते. त्यानंतर शहरात उमेदवार बदलाच्या चर्चाही सुरु झाल्या होत्या. याबाबत जिल्हाध्यक्ष फाळके यांनी स्पष्टीकरण देत उमेदवारीत कुठलाही बदल होणार नाही, अभिषेक कळमकर हेच उमेदवार असतील असे सांगितले आहे.

## भगवान पालवे यांचे अल्प आजाराने निधन



नगर - निर्मलनगर, सावेडी येथील रहिवासी भगवान विश्वनाथ पालवे (वय ५६) यांचे २९ ऑक्टोबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या मागे पत्नी, एक मुलगा असा परिवार आहे. शुभम पालवे यांचे वडील तर संगीता पालवे यांचे ते पती होत.

## प्रल्हाद कुलथे यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - चिचोंडी पाटील (ता.नगर) येथील रहिवासी प्रल्हाद शंकर कुलथे (पोस्टमन सोनार, वय ८५) यांचे २८ ऑक्टोबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर चिचोंडी पाटील येथील अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. अतुल व जीवन कुलथे यांचे ते वडील होत.

## तरुणाचा रेल्वे अपघातात मृत्यू

नगर - रेल्वे अपघातात तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना अकोळनेर (ता. नगर) शिवारात रेल्वे पटरीच्या जवळ घडली. अमोल राजाराम कोंडा (वय ३५, रा. श्रमिकनगर, पाईपलाइन रस्ता, भिस्तबाग चौक समोर, सावेडी) असे मयत तरुणाचे नाव आहे. याप्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.



**अमोल कोंडा**

अमोल राजाराम कोंडा यांचा रविवारी (दि.२७) दुपारी दीडच्या सुमारास रेल्वे पटरीच्याजवळ अकोळनेर येथे रेल्वे अपघात झाला. जखमी अमोल यांना त्यांचा भाऊ विशाल राजाराम कोंडा यांनी उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात आणले. दरम्यान, तेथील डॉ. बटुळे यांनी तपासणी केली असता त्यांचा मृत्यू झाला असल्याचे त्यांनी घोषित केले. तशी माहिती त्यांनी रुग्णालयात ड्युटीवर असलेले पोलीस अंमलदार बी. एस. गायकवाड यांना दिली. त्यांनी दिलेल्या खबरीवरून नगर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# मटका व्यवसायिकाकडे लाच मागणाऱ्या तीन पोलिस कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल

**नगरच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई**

नगर - मटका व्यावसायिकाला त्याच्या मटक्याच्या व्यवसायावर कारवाई न करण्यासाठी ५ हजारांची लाच आणि महागडे दारूचे खंबे मागणाऱ्या ३ पोलिस कर्मचाऱ्यांवर नगरच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने गुन्हा दाखल केला आहे. पो.ना. रघुवीर ओंकार कारखिले, पो.कॉ. राहुल महादेव नरवडे, पो.कॉ. गौतम शंकर लगड (सर्व नेमणूक श्रीरामपूर शहर पोलीस स्टेशन) अशी या पोलिस कर्मचाऱ्यांची नावे आहेत.

यातील तक्रारदार यांचा श्रीरामपूर येथे मटक्याचा व्यवसाय असून तक्रारदार यांचे मटक्याचे व्यवसायावर कारवाई न करता मटक्याचा व्यवसाय चालू ठेवण्याकरता पो.ना. कारखिले यांनी तक्रारदार यांच्याकडे ६ हजार रुपये लाचेची मागणी केल्याबाबतची तक्रार दि.६ सप्टेंबर २०२४ रोजी नगरच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे करण्यात आली होती. सदर लाच मागणी तक्रारीच्या अनुषंगाने त्याच दिवशी लाच मागणी पडताळणी करण्यात आली. लाच मागणी पडताळणी दरम्यान पो.ना. कारखिले यांनी तक्रारदार यांच्याकडे त्यांच्या मटक्याच्या व्यवसायावर कारवाई न करता व्यवसाय चालू ठेवण्यासाठी ६ हजार रुपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती ५ हजार रुपये लाचेची मागणी केली. त्यानंतर आरोपी पो.ना.कारखिले यांनी तक्रारदार नको म्हणत असताना त्यांना त्यांच्या मटक्याच्या व्यवसायाच्या ठिकाणी घेऊन जाऊन त्या ठिकाणावरून तक्रारदार यांच्याकडून ४ हजार रुपये अशी रक्कम स्वीकारली व उर्वरित १ हजार रुपये व दारूच्या खंब्याची मागणी केली व पो.कॉ. राहुल नरवडे यांनी तक्रारदार यांच्या मटक्याचे व्यवसायावर कारवाई न करता त्यांचा मटक्याचा व्यवसाय चालू ठेवण्यासाठी २६०० रुपये किंमतीची हंड्रेड पाईपर कंपनीची दारूच्या बाटलीची मागणी करून ती स्वीकारण्याची तयारी दर्शवली. पो. कॉ. नरवडे यांनी मागणी केलेली दारूची बाटली आणण्यासाठी पो.कॉ.गौतम लगड यांनी तक्रारदार यांना प्रोत्साहन दिले. सदर बाबत तिन्ही पोलिस कर्मचाऱ्यांच्या विरुद्ध मंगळवारी (दि.२९) श्रीरामपूर शहर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस उप अधीक्षक अजित त्रिपुटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक राजू आल्हाट, पोलीस अंमलदार किशोर लाड, सचिन सुद्रुक, गजानन गायकवाड, उमेश मोरे, चालक पो.हे.कॉ. दशरथ लाड यांच्या पथकाने ही कारवाई केली.

# गृहिणी

## आरोग्य

### तुळशीची लाभदायी बी

तुळशीच्या बीचा वापर अनेक कारणांसाठी केला जातो. यात अनेक पोषक घटक असतात. तसंच तुळशीच्या बी मध्ये लोह, फायबर आणि प्रथिनं मुबलक प्रमाणात असतात. या बियांना सबजा असंही म्हटलं जातं. सबजा पचनासाठी चांगला असतो. वजन कमी करताना याचा वापर केला जातो. सर्दी–खोकल्यावरही सबजा गुणकारी आहे. सबजाच्या सेवनामुळे रोगप्रतिकारशक्ती वाढते. सबजामुळे शरीराचा दाह कमी होतो. सबजामुळे ताणतणाव कमी व्हायला मदत होते. तुळशीची गुणकारी बी आहारात असायला हवी.

## दिवाळी स्पेशल पाककला

### कणकेच्या चकल्या

**साहित्य :** कणीक, तिखट, मीठ, हिंग, हळद, तीळ, ओवा.

**कृती :** कणकेमध्ये चवीप्रमाणे तिखट, मीठ, हिंग, तीळ व ओवा घालावा. नंतर हे सर्व साहित्य एकत्र मिसळून एका फडक्यात सैलसर बांधावे.

नंतर ही पुरचुंडी कुकरमध्ये दहा–पंधरा मिनिटे ठेवून, वाफवून घ्यावी. नंतर ती बाहेर काढून त्यातील वाफवलेली कणीक बाहेर काढून, त्याला पाण्याचा हात लावून, चांगली मळावी व त्याच्या चकल्या करून तेलात तळाव्यात.

## वास्तू

### घर व सांबरानी

* घरातील नकारात्मक ऊर्जा नाहीशी करण्यासाठी सांबरानी जाळली पाहिजे. घरात कोणी आजारी असले तरी सांबरानी जाळणे चांगले मानले जाते. त्याचा पर्यावरणावर सकारात्मक परिणाम होतो. सांबरानी जाळल्याने घरातील ऊर्जा शुद्ध होते. ते जाळल्याने मानसिक ताणही दूर होतो.

* घरामध्ये गॅस अथवा स्टोव्ह आणि सिंक एकमेकांजवळ असू नये.

## सल्ला

चेहऱ्याला बटाट्याचा रस लावा. बटाट्याच्या नैसर्गिक ब्लीचिंग गुणांमुळे काळे डाग कमी होतात. चेहरा स्वच्छ धुण्यापूर्वी रस पंधरा मिनिटे बसू द्या.

## सौंदर्य

तुमची त्वचा अधिक तेजस्वी बनवण्यासाठी, चंदनाची पेस्ट लावा. चंदन शांत आहे आणि रंग सुधारण्यास मदत करते. पेस्ट सुकल्यानंतर, लावा आणि स्वच्छ धुवा.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

बुधवार, दि. ३० ऑक्टोबर २०२४

**शिवरात्री, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, आश्विन कृष्णपक्ष, हस्त २१।४४, सूर्योदय ०६ वा. २९ मि. सूर्यास्त ०६ वा. ३० मि.**

## राशिभविष्य

**मेष** : नवीन मित्रांच्या ओळखी होतील. भविष्यात त्यांचा उपयोग होईल. सरकारी कामे सफल होतील.

**वृषभ** : आपल्या सहकार्यांबरोबर झालेल्या मतभेदांचे निराकरण होईल. अधिकार क्षेत्रात वाढ होईल.

**मिथुन** : मोठ्यांचा सहवास लाभेल, त्यांना भेटून आनंद होईल. दूर किंवा विदेशात असलेल्या संततीच्या शुभवार्ता मिळतील.

**कर्क** : विशेषतः धंदा–व्यवसाय करणाऱ्यांना आज फारच लाभदायक दिवस आहे. मित्राच्या भेटीतून आनंद मिळेल.

**सिंह** : भेटीचे योग येतील. अचानक धनलाभ संभवतो. प्रवास होतील. काम करायला उत्साह वाटणार नाही.

**कन्या** : खर्च अधिक होईल. कुटुंबियांबरोबर संघर्ष होईल. कौटुंबिक वातावरण त्रासदायक राहील. पितृचिंता सतावेल.

**तूळ** : नवे परिचय लाभदायी होणार नाहीत. सरकार विरोधी कारवाईमुळे अडचणीत याल.

**वृश्चिक** : शारीरिक व मानसिक स्वास्थ्य लाभेल. आर्थिक लाभ होईल. स्त्री पक्षाचे सहकार्य लाभेल.

**धनु** : प्रतिस्पर्ध्यांवर विजय मिळवाल. चर्चा–वादविवाद यातही तुमचा प्रभाव राहील. कष्टाच्या मानाने यश संतोषजनक असेल.

**मकर** : आजचा वेळ वाया घालवणे तोट्याचे ठरेल. आपल्या सर्जनशील व कलात्मक वैशिष्ट्यांना प्रेरणा मिळेल.

**कुंभ** : आपल्या जुन्या लोकांना किंवा आधार देणाऱ्या मित्रांना जोडणे यावेळी आपल्यासाठी फलदायी आहे.

**मीन** : राजकीय विषयांमध्ये स्थिती सुखद राहील. सांसारिक किंवा इतर प्रश्नांमुळे मन उदास राहील.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## हसा आणि शतायुषी व्हा!


एका लग्नाच्या कार्यालयात एका माणसाला मुलीकडचे विचारतात, तुम्ही वर पिता का ?
उत्तर – तसं काही नाही. खाली व्यवस्था केली असेल तरीही चालेल

## ...वाढवूया आपले सामान्य ज्ञान

* हेलिकॉप्टरचा शोध कोणी लावला? – सिरोस्की
* राष्ट्रीय महामार्ग १६ कोठून कोठे जातो? – निजामाबाद ते जगदाळपूर
* नोबेल पारितोषिकच्या १ ल्या भारतीय महिला कोण? – मदर तेरेसा
* युनिसेफ ही संस्था कोणाशी संबंधित आहे? – लहान मुले

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## शब्दगंध क्र. ७०४१ सौ.शैलजा कुलकर्णी



शब्दगंध क्र. ७०४० चे उत्तर



**आडवे शब्द :–** १) एक म्हण +++चा माल गपापा ४) सांगता; समाप्ती ७) कापडचोपड; वस्त्रप्रावरण ८) तीन गुणांपैकी एक; धूळ ९) उसापासून बनणारा एक गोड पदार्थ १०) चहा पिण्याचे एक भांडे १२) खाली मोठे व वर उत्तरोत्तर लहान अशी भांडी वगैरे ठेवून केलेली रचना १४) दृढ; पक्का; निश्चयी १६) मस्ती; जोर १८) घराच्या मागची मोकळी जागा १९) पक्ष्यांचा उडण्यासाठी या अवयवाचा उपयोग होतो २०) छांदिष्ट; लहर येईल तसे वागणारा २२) फळातील रसाळ भाग; मगज २३) चलाख; हुशार; ताजातवाना

**उभे शब्द :–** १) अकारण किंवा सकारण; न्यायाने किंवा अन्यायाने २) अधर्म; पातक ३) पराभव; हार ४) अधिकार; अंमल ६) दृष्टी ५) स्पष्ट; निर्भीड ९) आंब्याचे जाळे; गायनातील एक राग ११) पर्वतावरचा सपाट प्रदेश १३) 'जर'चा जोडीदार; त्याअर्थी १५) विचारविनिमय; खलबत १७) आच्छादन; पांघरूण १८) पण १९) भोजनास बसलेल्या अनेक लोकांची रांग २१) प्रत्येक; महादेव; दर; शंकर

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक :
ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : कष्ट ही एक अशी चावी आहे जे नशीबात नसलेल्या गोष्टींचे सुध्दा दरवाजे उघडते.

## मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

### सिमेंट काँक्रीटचा शोध कसा व कोणी लावला?

पर्यावरणाबद्दल बोलत असताना एक वाक्य नेहमी ऐकायला मिळतं, खरी जंगलं जाऊन काँक्रीटची जंगलं उभी राहिली आहेत. सिमेंट आणि त्यापासून तयार होणाऱ्या काँक्रीटचा शोध लागला नसता, तर आपण आजही दगड–मातीच्या घरात राहात असतो. उंच आणि मजबूत इमारती बांधणं शक्य झालं नसतं आणि आजची अत्याधुनिक अवाढव्य शहरं दिसली नसती. सिमेंट–काँकीटमुळे केवळ बिल्डिंगच नव्हे तर मोठमोठाले पूल, रस्ते, धरणं बांधणं शक्य झालं. म्हणजे एका प्रकारे विचार केला तर मनुष्याच्या भोवतालचं जग आज काँक्रीटनेच बनलेलं आहे.

अर्थात काँक्रिटशिवाय झालेली अनेक मोठाली बांधकामं आहेत. मग ते इजिप्तचे पिरॅमिड असोत वा आग्र्याचा ताज महाल, पण आधुनिक बांधकामयुगाची आणि तंत्राची पायाभरणी १८२४ साली जोसेफ एस्पडिन नावाच्या एका इंग्रज माणसानं पोर्टलँड सिमेंटचा शोध लावल्यानंतर झाली असं म्हणायला हरकत नाही.

### दुष्टाला मदत नको

एका धष्टपुष्ट आणि लबाड लांडग्यामागं एक धनगर लागला होता. त्याच्या कळपातल्या कोकरांना तो लांडगा त्रास देत असे. लांडगा पुढं आणि धनगर मागं असं ते दोघं पळत होते. पळता पळता एका आडोशाला त्या लांडग्याला एक कोकरू दिसलं.

लांडग्यानं त्या कोकराला दटावलं, डोळ्यांनी भीती दाखवली आणि त्याच्यापुढे ऐटबाज मल्लासारखा उभा राहून तो म्हणाला, ए कोकऱ्या, मी काय सांगतो ते नीट ऐक. माझ्यामागं धनगर लागलाय. मी या झुडपात लपतो. तो तुला विचारील लांडगा कुठं गेला, तेव्हा तू त्याला सांग 'लांडगा दुसऱ्या रस्त्यानं गेला.' याद राख, मी इथं लपलो आहे हे त्या धनगराला अजिबात सांगू नकोस. तू माझं ऐकलंस, तर मी तुला बक्षीस देईन.

गरीब बिचाऱ्या कोकारानं मान हलवली. लांडगा झुडपात लपला. इतक्यात धनगर तिथं आला. त्यानं कोकराला विचारलं, लांडगा पाहिलास का? कोकरू म्हणालं, मालक, लांडगा त्या बाजूने गेला. मी त्याला पाहिलं. इथं नाही आला तो.'

कोकरानं दाखवलेल्या मार्गानं धनगर धावू लागला. थोड्या वेळानं झुडपात लपलेला लांडगा ऐटीत बाहेर आला.

लांडग्याला पाहून कोकरू म्हणालं, लांडगेदादा, तुम्ही माझ्यामुळे वाचलात, आता मला माझं बक्षीस द्या.

अरे बाबा, माझ्या हातात सापडूनही मी तुला खात नाही. हेच तुझं बक्षीस नाही का? जा आता! मीही पळतो इथून!

लांडगा पळून गेला. कोकरू मनात म्हणालं, देवाची कृपा म्हणून मी वाचलो. हे लबाड लांडगे असेच असतात. आपल्या ताकदीच्या जोरावर ते माझ्यासारख्या गरीब प्राण्यांवर सत्ता गाजवतात. खरं तर मी त्याला मदत करायला नको होती. कधीतरी तो आपल्याला किंवा इतर कोकरांना त्रास देणारच!

तात्पर्य : दुष्टांना मदत करणं चुकीचं आहे.

## जीवन चक्र – मृत्यू रहस्य (जीवन की रोशनी)



सज्जन सेई नालि मैं,
चलदियाँ नालि चलनि ॥
जिथै लेखा मंगीयै
तिथे खड़े दिसंनि ॥
(सूही म: १ )

दरवेशों के शिष्यों के अच्छे या बुरे कर्मों का हिसाब नहीं लिया जाता। उनके लिए गुरु ही सब कुछ होता है। शिष्य के कर्म चाहे गलत हों या ठीक, इनका लेखा केवल गुरू के पास होता है और वह जैसा चाहे इनको भुगतवा देता है ।

पिता में जीवन है और यही जीवन उसने अपने पुत्र को दिया है और उसे न्याय करने का अधिकार दिया है क्योंकि वह हमारी तरह मनुष्य तन में होता है।

(बाईबल)

गुरु की शिष्य के प्रति इसी सावधानी के कारण ही श्री गुरु नानक

देव जी फरमाते हैं:–

सचा सतिगुरु सेवि सच समालिया ॥
अंति खलोआ आई जि सतिगुरू अगै घालिया ॥

### जीवन की रोशनी

पोहि न सकै जमकालु, सचा दीवा रखवालिया ॥ साखी जोति जगाई दीवा बालिया ॥

मनमुख विणु नावै कूड़ियार फिरहि बेतालिया ॥ पशू माणष चंगि पलेटे अन्दरहु कालिया ॥

अर्थात् 'सचे गुरु – (मलार वार)

से प्यार कर और सचा धन कमा। जो उस पर पूरा विश्वास करता है गुरु उसे बचा लेता है। मनमुख मनुष्य में हैं जो प्रेतों की तरह ऊपर नीचे घूमते रहते हैं।' पशु के भेष गुरु के लिए दूरी या फासला कोई महत्व नहीं रखता। शिष्य चाहे दूर हो या निकट, गुरु ताकत अन्त समय, बल्कि इससे कुछ समय पहले ही आ जाती है। वह शिष्य को यह दुनिया छोड़कर जाने के निश्चित समय के बारे में सूचना दे देता है और इसी अनुसार उस को लेने के लिए आ जाता है। गुरु का सूक्ष्म शरीर बड़ा तेजमयी होता है और वह आत्मा को ऊपरी मण्डलों में उसके जीवन के दौरान किये अभ्यास के अनुसार नियत जगह पर ले जाकर आवश्यक निर्देश देकर बिठा देता है ताकि वह आगे अभ्यास द्वारा इस रूहानी पथ का पूर्ण विकास कर सके। मेरे पिता के घर बहुत सारे महल हैं। अगर ऐसा न होता तो मैं तुझे बता देता क्योंकि मैं तेरे लिए स्थान बनाने चला हूँ। मैं दोबारा आऊँगा और तुझे अपने स्थान पर ले जाऊँगा ताकि तू भी वहाँ रह सके।

अगर किसी को त्रुटियों या कमजोरियों के कारण दण्ड भी देना पड़े तो गुरु उसे नर्कों की यातनाओं के लिए यमों के अधीन नहीं होने देता बल्कि स्वयं आवश्यक दण्ड दे देता है। कर्मों का हिसाब रखने वाले धर्मराज का गुरु के श्रद्धालु शिष्यों के कर्मों पर कोई हुक्म नहीं चलता क्योंकि वे गुरु के नाम पर जीवन व्यतीत करते हैं जो कि एक शक्तिशाली मीनार है। धर्मराज को उनका फैसला सुनाने और न्याय करने का कोई अधिकार नहीं। इनके बारे में गुरु जैसे ठीक समझे स्वयं न्याय करता है।

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग – २)

जीवन ही बदल देगा। –जब भी मन में कोई व्यर्थ संकल्प आये तुरंत कुछ न कुछ सकारात्मक बुक से या अव्यक्त मुरली से पढ़ लें। अगर समस्या ज्यादा हैं तब लगतार कोई न कोई बुक पढ़ते रहो, जब तक तुम्हें समस्या का हल नहीं मिल जाता ।

शारीरिक शक्ति और ८०/२० का नियम

८०–२० नियम का यह अर्थ नहीं है कि हर मामले में सटीक ८०% और २०% अनुपात जरूरी है। सभी अवसरों पर ८०/२० नियम लागू नहीं होता, कभी–कभी यह ९०/१० या ७०/३० तक हो सकता है। ८०/२० का नियम इस संसार के प्रत्येक क्षेत्र में लागू हो रहा हैं। हमारे शरीर में ८०% पानी हैं और २०% खून हैं। हम भोजन खाते हैं पचाने का कार्य शरीर अपने आप करता हैं। हमें सिर्फ भोजन खाने और भोजन प्रबंध करने का २०% कार्य करना हैं, बाकी ८०% कार्य शरीर अपने आप करता हैं। इस नियम का उपयोग सुबह की सैर या फिर नहाने–धोने के समय भी कर सकते हैं इस समय २०% कार्य यह करना हैं कि आप अपने डिजिटल रिकॉर्डर या केसेट पर पॉजिटिव थिंकिंग की बुक्स को सुन सकते हैं। सेहत के लिये २०% कार्य यह हैं कि आप सुबह शक्ति वर्धक और घर में बनाया हुआ नाश्ता करते हैं तो आप को सारा दिन भूख नहीं लगेगी और आप आराम से कार्य करते रहेंगे।

### अंतरीक बल

नहीं तो सारा दिन कुछ ना कुछ खाते रहेंगे।

सुबह शक्तिशाली भोजन करने से आप को गुस्सा भी नहीं आएगा और आएगा तो बहुत कम होगा। जब हम भूखे होते हैं या कम एनेर्जी वाला भोजन खाते हैं तो उस से शक्ति नहीं मिलती जिस से बहुत गुस्सा आता है। बच्चों को अगर सुबह अच्छा नाश्ता करवा देते हैं तो वह भी चिड़चिड़े नहीं बनते और फास्ट फूड नहीं खाएंगे। चूसती के लिये २०% कार्य यह कि हम सभी सुबह ही नहा लेते हैं इससे हम फ्रेश हो जाते हैं और सारा दिन खुशी से कार्य करते हैं। अगर न नहाए तो सारा दिन आलस्य रहेगा और मूड खराब रहेगा। यह कार्य हमें ही करना होगा। वात पित और कफ के असंतुलन से रोग लगते हैं। इस असंतुलन को समझने का कारण आप को ही जानना होगा और २०% कार्य यह है कि आप को आयुर्वेद के बारे हर रोज कुछ न कुछ पढ़ना

। व्यायाम करने से स्वास्थ रहते हैं यह २०% कार्य आप को ही करना हैं। राजयोग के अभ्यास से रोग ठीक होते हैं। यह २०% कार्य आप को ही करना हैं। शरीर पांच तत्वों से बना है। इसके बारे जानने का २०% कार्य आप को ही करना हैं। आसनों के द्वारा रोग ठीक होते हैं। इनके अभ्यास करने का २०% कार्य आप को ही करना हैं। संपूर्ण भोजन और नींद से शरीर ठीक रहता हैं। यह २०% कार्य आप को ही करना हैं। शरीर को चुस्त दुरुस्त रखना आप का कर्तव्य हैं। आप के इस २०% प्रयास से आप की ८०% प्रतिशत शारीरिक समस्याएं अपने आप खत्म हो जाएगी। समय प्रबन्धन में ८०/२० का नियम और धन धन हरेक व्यक्ति, परिवार और किसी भी देश की रीढ़ की हड्डी है। संसार का ८०% धन २०% लोगों के पास है । दूसरे शब्दो में ८०% लोगों के पास सिर्फ २०% धन हैं। प्रत्येक व्यक्ति धन के लिये दिन रात मेहनत करता हैं फिर भी सारी जिंदगी पैसे से संतुष्टि नहीं होती। धनवान कौन हैं। हमारे पास इतना पैसा हो जिसे हम ब्याज पर दें। उस से जो ब्याज मिलती है उस ब्याज को हम फिर बैंक में जमा करा दे। उस ब्याज के पैसे से जो ब्याज मिलती है, उस से हमारे जीवन के सभी खर्चे चलें। इसे कहेंगें कि हम साहूकार हैं, धनवान हैं। अगर ऐसा नहीं है तो आप चाहे करोड़पति हैं, अरब पति हैं, तब भी आप मजदूर हैं। आप कमाते हैं और खाते हैं। मजदूर ३००–४०० प्रति दिन कमाता हैं। आप एक लाख या एक करोड़ प्रति दिन कमाते हैं। धनवान बनने के लिय आप को ८०/२० के नियम का

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## स्त्री स्वास्थ्याचे कानमंत्र आरोग्य सखी

सतत मधुर संगीत, बासरी वादन, तबला वादन, गायत्री मंत्र यांच्या सी.डी. असाव्यात. टि.व्ही. वरचे कार्यक्रम भीतीदायक नसावेत. सूड उगविणारे, सूड रियल्स बसू नयेत. त्यापेक्षा आनंदी चित्रपट, बाल चित्रपट, डिस्कव्हरी, आस्था चॅनेल्स बघावीत. घरामध्ये कोणत्याही प्रकारचे वाद विवाद होऊन गर्भवतीचा मानसिक ताण वाढेल, असे वातावरण असू नये. गर्भवती स्त्रीने नेहमी आनंदी व प्रसन्न असावे.

**पतीचा आधार :** गर्भवती स्त्रीला गर्भावस्थेमध्ये पतीच्या आधाराची गरज असते. स्त्रीच्या जन्मानंतर सर्वात जवळची व्यक्ती आई असते, तर लग्नानंतर सर्वांत जवळची व्यक्ती पती असतो. गर्भावस्थेतील बाळाला देखील वडिलांची गरज असते. आईच्या गर्भात असताना गर्भस्थ बाळाला त्याच्या आईच्या मानसिक चढ उताराची जाणीव होत असते. आपला पित्याचा आपल्या आईला किती आधार मिळतो याची नोंदही बाळाकडे होत असते. म्हणुनच भावी पित्याने पत्नीला या काळात मदत करावी. जर या काळात भावी पित्याने मदत केली नाही तर ही मुले भविष्यात बंडखोर वृत्तीची व वडिलांचा आदर न ठेवणारी होवू शकतात. म्हणून प्रत्येक पित्याने जागरुक होऊन ही जबाबदारी आनंदाने उचलावी. जन्म झाल्यावर बाळ माता–पित्यांचा आवाज ओळखते, कारण तो आवाज त्याच्या ओळखीचा असतो. गर्भावस्थेपासूनच त्याने मातापित्यांचा आवाज ऐकलेला असतो. पतीने जेवढे शक्य होईल तेवढे गर्भावस्थेत पत्नीजवळ राहावे व तिला मानसिक आधार द्यावा. बऱ्याचशा गर्भवती स्त्रिया डॉक्टरांनी दिलेले औषधोपचार घेण्यास कंटाळा करतात. त्याकरिता आपल्या पत्नीने औषधे घेतली आहेत की नाहीत. हे बघावे. तिच्या आहारामध्ये सात्त्विक, पौष्टिक पदार्थ असावेत; त्यामुळे बाळ सुदृढ होऊन निरोगी जन्माला येईल. या काळात पतीने कुठल्याही प्रकारचे व्यसन करू नये, कारण त्यामुळे बाळावर दुष्परिणाम होऊन बाळामध्ये शारीरिक व मानसिक व्यंगत्व येऊ शकते. गर्भावस्थेमध्ये गर्भवती व बाळ या दोघांच्या आरोग्यासाठी खालील तपासण्या करणे महत्त्वाचे असते.

### गर्भावस्थेत कौटुंबिक आधार

**१) हिमोग्लोबीन :** हिमोग्लोबीन तपासणीमुळे गर्भवती स्त्रीच्या शरीरातील रक्ताचे प्रमाण

किती आहे, हे समजते. गर्भवती स्त्रीचे रक्ताचे प्रमाण कमी असल्यास त्याचा बाळाच्या शारीरिक व मानसिक वाढीवर परिणाम होतो, कारण रक्तधातूचा उपधातू असलेल्या रसधातूवर गर्भाचे पोषण अवलंबून असते. प्रसूतीच्या वेळेला गर्भवती स्त्रीच्या शरीरातले रक्ताचे प्रमाण कमी असल्यास तिच्या जीवाला धोका पोहोचू शकतो. अशी वेळ येऊ नये; म्हणून गर्भवती स्त्रीने प्रथमपासूनच डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार आयर्नच्या टॅबलेट्स, आयुर्वेदिक औषधोपचार व आहार योजना करावी. आहारामध्ये काळी खजूर, काळे मनुके, गूळ, शेंगदाण्याचा लाडू रोज १, नाचणीचा लाडू, शेंगदाणा चिक्की, पालेभाज्या, बीट, सफरचंद, टोमॅटो यांचा समावेश करावा. ही तपासणी परत एकदा ७व्या व ९व्या महिन्यात करुन घ्यावी कारण प्रसूती करताना रक्ताचे प्रमाण योग्य असणे आवश्यक आहे.

(क्रमश:)

**डॉ. शारदा निर्मळ–महांड्ळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं– ८७९३४००४००

# निश्चित ध्येय, कठोर परिश्रमाने हमखास यश

## जगन्नाथ भोर यांचे प्रतिपादन; दि अहमदनगर प्रेस ॲण्ड अलाईड ओनर्स असोसिएशनच्या वतीने गुणगौरव साजरा



दि अहमदनगर प्रेस ॲण्ड अलाईड ओनर्स असोसिएशनच्या वतीने पटेल मंगल कार्यालयात आयोजित मुद्राकांच्या पाल्यांच्या गुणगौरव सोहळ्याप्रसंगी जि.प.चे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी जगन्नाथ भोर आदी.

नगर – जग झपाट्याने बदलत आहे या बदलत्या तंत्रज्ञानाशी समरस होऊन परिस्थितीशी दोन हात करण्याची तयारी युवकांनी ठेवावी. निश्चित ध्येय आणि कठोर परिश्रमाने हमखास यश मिळते असे प्रतिपादन माजी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी जगन्नाथ भोर यांनी केले.

शहरातील पटेलवाडी मंगल कार्यालय येथे दि अहमदनगर प्रेस ॲण्ड अलाईड ओनर्स असोसिएशनच्या वतीने विविध क्षेत्रात उत्तुंग यश मिळविलेल्या मुद्रकांच्या पाल्यांचा गुणगौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अध्यक्षीय भाषणात जगन्नाथ भोर बोलत होते.

याप्रसंगी मास्टर माईंड करीअर अॅकॅडमीचे संचालक प्रा. अमोल सायंबर, महाराष्ट्र मुद्रण परिषदेचे उपाध्यक्ष मनोज बनकर, मुद्राचे कार्यकारी संपादक सुदर्शन बोगा, दि अहमदनगर प्रेस ॲण्ड अलाईड ओनर्स असोसिएशनचे अध्यक्ष ह.भ.प. सिध्दीनाथ मेटे महाराज, सचिव नंदेश शिंदे, उपाध्यक्ष सुखदेव सुंबे, खजिनदार राजेंद्र नजन, मुकुंद दळवी, गिरीश बचा, मनीष झवर, पोपट शेळके, संजय बाले आदी उपस्थित होते.

याप्रसंगी पुढे बोलतांना भोर म्हणाले, महाराष्ट्राची आर्थिक परिस्थिती चांगली असल्यामुळे मोठ्या प्रमाणात नोकरीच्या संधी उपब्ध आहेत मात्र मराठी माणसाची कष्ट करण्याची तयारी नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश या अप्रगत राज्यामध्ये खाजगी नोकरीच्या संधी नसल्याने केंद्रसरकारच्या सेवेत बहुतांश ठिकाणी त्यांचे मुले असल्याचे जाणवते. पालकांनी आपल्या मुलांचे कला गुण ओखळून त्या क्षेत्रा काम करण्यासाठी प्रेरणा द्यावी. प्रत्येक माणूस हा वेगळा असतो. राज्यासाठी देशासाठी खुप काही करण्याची भूमीका आपल्या मनात असावी असे ते म्हणाले.

याप्रसंगी प्रा. अमोल सायंबर म्हणाले की, मुद्रण व्यवसाय हा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे विचार प्रसार करण्याचं साधन आहे. सत्कार केलेल्या मुलांनी हुरळून न जाता आपली जबाबदारी वाढली असून पुढे खुप काही करण्यासाठीच हा सन्मान केला असल्याची भावना मनात ठेवावी. परिक्षेत मार्क मिळण्यासाठी अभ्यास न करता ज्ञानाचे उपयोजन करायला शिकले पाहिजे.

दि अहमदनगर प्रेस ॲण्ड अलाईड ओनर्स असोसिएशनचे अध्यक्ष ह.भ.प. सिध्दीनाथ मेटे महाराज यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. त्यांनी कार्यक्रमाची भूमीका मांडून संस्थेच्या कामकाजाचा आढावा आणि माहिती दिली.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नितीन धुमाळ, पंकज जाधव, सचिन ढुबे, योगेश सोमानी, संजय कुर्हे, संतोष वन्नम, शोएब शेख, सुबोध रसाळ आदींनी परिश्रम घेतले.

सुत्रसंचालन अरुण पवार सर यांनी केले तर आभार संस्थेचे सचिव नंदेश शिंदे यांनी मानले.



सावेडीत दिवाळी सणासाठी गरजूंना कपडे वाटप करण्यात आले. याप्रसंगी चिन्मय सुखटणकर, प्रसाद मांढरे, ईश्वर सुराणा, विनोद सोळंकी, दिलीप कोठारी, डॉ. दत्ता पोंदे, प्रमोद छाजेड, ग्रुपचे सदस्य आदि (छाया – विजय मते)

# दुसऱ्यांच्या सुखात स्वतःचा आनंद शोधा

## चिन्मय सुखटणकर यांचे प्रतिपादन; माणुसकीची भिंत उपक्रमास सावेडीत प्रतिसाद

नगर – माणसाने माणुसकी हा धर्म पाळला तर समाजातील सर्व जाती धर्मात सर्व धर्म समभाव निर्माण होईल. एकमेकांचे सुखदुःख वाटून घेण्यात मानवधर्म आहे. त्यामुळेच नको असेल ते द्या. हवे असेल ते घेऊन जा. या माणुसकीची भिंत संकल्पनेला दिवाळी सणात गोरगरीब, वंचित कुटुंब, गरजूंना मोठा आधार मिळाला आहे. दुसऱ्यांच्या सुखात स्वतःचा आनंद शोधा म्हणजे दुःखी कोणी राहणार नाही. असे प्रतिपादन उद्योगपती चिन्मय सुखटणकर यांनी केले आहे.

सावेडी येथे जॉगिंग ट्रॅकवर गरजूंना कपडे वाटपाचा उपक्रम राबविण्यात आला. १०० ते १५० जणांनी लाभ घेतला याप्रसंगी चिन्मय सुखटणकर, डॉ. दत्ता पोंदे, प्रसाद मांढरे, ईश्वर सुराणा, विनोद साळुंकी, प्रमोद छाजेड, दिलीप कोठारी, सवंगडी ८२ ग्रुप, स्नेह ७५ ग्रुप, एमआयडीसी उद्योजक ग्रुप लायन्स क्लब मिडटाऊनचे सदस्य उपस्थित होते.

डॉ. पोंदे म्हणाले नको असेल ते द्या, हवे असेल ते घेऊन जा. ही संकल्पना मला सुचली या आधारे माणुसकीची भिंत म्हणून गरजूंना आधार देण्यासाठी आवाहन केल्याप्रमाणे ग्रुपच्या सदस्यांसह नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर कपडे देऊन सहभाग नोंदविला. आज या उपक्रमात शंभर ते दीडशे गरजू लोकांना त्याचा लाभ झाला. त्यांच्या सुखात आमचा आनंद शोधण्याचा हा प्रयत्न आहे.

या वेळी योगेश श्रोत्रीय, धिरेन भळगट, संजय आहेर, सौ. रजनी ढोरजे, डॉ. अस्मिता अष्टेकर, सौ. आरती खाडीलकर, रचना काकडे, नितीन काकडे, सागर अष्टेकर, सौ. संपूर्णा सावंत उपस्थित होते.





अहिल्यानगर जिल्हा रोल बॉल संघटना व टीम टॉपर्स स्केटिंग अकॅडमी आयोजित मोफत प्रशिक्षण शिबिरात सहभागी झालेले खेळाडू

# जिल्हा रोल बॉल संघटना व टीम टॉपर्स स्केटिंग ॲकॅडमी आयोजित मोफत प्रशिक्षण शिबिरास प्रतिसाद

नगर – जिल्हा क्रीडा संकुल, वाडिया पार्क येथे अहील्यानगर जिल्हा रोल बॉल संघटना व टीम टॉपर स्केटिंग अॅकॅडमीच्यावतीने आयोजित मोफत प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन २७ नोव्हेंबर रोजी शगुन ज्वेलर्सचे संचालक सुनील डहाळे यांच्या हस्ते तसेच टेनिस बॉल क्रिकेट संघटनेचे अध्यक्ष अविनाश काळे, संचालक प्रविण गायकवाड, अरुणोदय क्रीडा प्रशिक्षण संस्थेचे संचालक महेश आनंदकर, महेश बागल, विशाल साळवे, अॅड. गौरव डहाळे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले. यावेळी १०० हुन अधिक खेळाडूंनी सहभाग नोंदविला.

यावेळी पाहुण्यांनी खेळाडूंना शुभेच्छा देत खेळामुळे आपण कसे तंदुरुस्त राहतो व व्यसनापासून कसे परावृत्त होतो याचे महत्व सांगितले.

रोल बॉल संघटना अध्यक्ष प्रदीप पाटोळे यांनी प्रशिक्षण शिबीराचे वैशिष्ट सांगितले. खेळाडूंना या प्रशिक्षण शिबिरातील खेळाडूंना भेटणारा लाभ सर्वांगीण विकास रोल बॉल तसेच स्केटिंग खेळातील उणीवा, गैरसमज अश्या अनेक महत्वपूर्ण बाबींची माहिती सचिव प्रशांत पाटोळे यांनी दिली.

सूत्रसंचालन व स्वागत प्रदीप पाटोळे यांनी केले. तसेच राष्ट्रीय रोल बॉल खेळाडू कु. जागृती बागल, रूद्र निकम, पारस निकम, राष्ट्रीय स्केटिंग खेळाडू क. कार्तिक नन्नवरे, वघुळूज, साद शेख यांचा सत्कार केला.

तसेच अमोल ठोंबे, अक्षय चौधरी, पियुष कदम, शारोन लाजरस, अदित्य सोनवणे, श्रीकांत कसाब, स्वप्नील साठे यांनी आयोजन कामी सहकार्य केले. सचिव प्रशांत पाटोळे यांनी उपस्थितांचे आभार मानले.



'सक्षम'तर्फे दिव्यांगासाठी दिवाळीनिमित्ताने भाऊबीज साजरी करुन दिवाळी फराळाचे वाटप केले. यावेळी अध्यक्ष डॉ.राजीव चिटगोपेकर, उपाध्यक्ष श्रीधर बापट, सुनिल जगधाळे, संध्या कुलकर्णी, सचिव वर्षा रोडे, भारती कुलकर्णी, ज्योती कुलकर्णी, तर सेवा भारतीचे डॉ.मनोहर देशपांडे, उदय भणगे आदी. (छाया – हेमंत ढाकेफळकर)

# 'सक्षम' तर्फे दिवाळी फराळाचे वाटप

नगर – सक्षम अर्थात समदृष्टी क्षमता विकास एवम् अनुसंधान मंडळातर्फे सर्व प्रकारच्या दिव्यांगासाठी कार्यरत अखिल भारतीय संघटन यांनी दिवाळीनिमित्ताने दिव्यांगाबरोबर भाऊबीज साजरी करुन दिवाळी फराळाचे वाटप केले.

यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष श्रीधर बापट म्हणाले की, 'सक्षम' नेहमीच समाजातील गरजू गरीब व दिव्यांग व्यक्तींसाठी कार्य करीत असून त्यामध्ये वेगवेगळे उपक्रम राबविले जातात. तर दिवाळीच्या मंगलमय वातावरणात आनंदी उत्साही व आरोग्यदायी दिवाळी कशी साजरी करावी यांचे मार्गदर्शन संस्थेचे अध्यक्ष डॉ.राजीव चिटगोपेकर यांनी केले. याप्रसंगी 'सक्षम'तर्फे ११० दिव्यांग व्यक्तींना फराळ व महिलांना साड्यांचे वाटप करण्यात आले.

याप्रसंगी संस्थेचे कोषाध्यक्ष सुनिल जगधाळे, उपाध्यक्षा संध्या कुलकर्णी, सचिव वर्षा रोडे, भारती कुलकर्णी, ज्योती कुलकर्णी, तर सेवा भारतीचे डॉ.मनोहर देशपांडे, उदय भणगे आणि 'सक्षम' चे कार्यकारीणी उपस्थित होते.

# गायक मुख्तार शाह यांचे शहरात स्वागत



गायक मुख्तार शाह यांचे नगर शहरात प्रेमदान चौकातील स्वीट होम मध्ये स्वागत करताना संगीत रसिक धनेश बोगावत.

नगर – गायक मुख्तार शाह यांचे शहरात संगीत रसिक धनेश बोगावत यांनी स्वागत केले. प्रेमदान चौकातील स्विट होम मध्ये शाह यांचा सत्कार करुन त्यांच्याशी गप्पागोष्टी रंगल्या होत्या. यावेळी उद्योजक रवी बक्षी, प्रसाद शेटे आदी उपस्थित होते.

देशभरात व परदेशात स्व. मुकेश यांचे प्रतिगायक अशी ओळख मिळवलेले मुख्तार शाह एका कार्यक्रमानिमित्त शहरात आले असता, नगरकरांच्या पाहुणचाराने ते भारावले. शहराला मोठा इतिहास असून, अनेक कलावतांचा वारसा या मातीला लाभला आहे. शहरात मोठ्या प्रमाणात कलारसिक असून, सातत्याने विविध संगीय व गायनाचे कार्यक्रम नगरमध्ये रंगत असल्याची माहिती बोगावत यांनी दिली. तर शाह यांना आजच्या काळातील मुकेश म्हणून पाहिले जात असल्याचे स्पष्ट करुन त्यांच्या गायनाचे कौतुक केले.

गायक मुख्तार शाह यांनी नगरकरांचे मिळालेले प्रेम नेहमीच स्मरणात राहणार आहे. येथील आदरतिथ्य व दिलेल्या सन्मानाने भारवलो असल्याचे सांगितले. तसेच बोगावत यांनी आपले दिवंगत वडिल छगनशेठ बोगावत हे देखील एक उत्तम कलाकार व संगीतप्रेमी होते. त्यांचा वारसा पुढे चालवत नवोदित कलाकारांना विविध प्रकारे प्रोत्साहन देऊन त्यांना पाठबळ दिले जात असल्याचेही सांगितले.




क्रीडा क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याबद्दल पै. नाना डोंगरे यांना क्रीडारत्न पुरस्कार प्रदान करताना कवी सुभाष सोनवणे. व्यासपीठावर इतर प्रमुख पाहुणे.

# पै. नाना डोंगरे यांना क्रीडा रत्न पुरस्कार प्रदान

नगर – क्रीडा क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याबद्दल दोस्ती फाऊंडेशनच्या वतीने नगर तालुका तालिम सेवा संघाचे अध्यक्ष पै. नाना डोंगरे यांना राज्यस्तरीय क्रीडा रत्न पुरस्काराने गौरविण्यात आले.

श्रीरामपूर येथे झालेल्या काव्य संमेलनात माजी शिक्षणाधिकारी तथा कवी धोंडीरामसिंह राजपूत व सेवानिवृत्त पोलीस अधिकारी तथा कवी सुभाष सोनवणे यांच्या हस्ते डोंगरे यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला.

यावेळी काव्य संमेलनाच्या अध्यक्षा रंजनाताई बोरा, ह.भ.प. सुनिताताई वाळूंज, साहित्यिक सुनिता कपाळे, फाऊंडेशनचे अध्यक्ष रज्जाक शेख, श्रीपाद मेहेंदे, मिराबक्ष शेख, आनंदा साळवे, देवीदास बुधवंत, अवीज शेख, परवेज शेख आदींसह साहित्यिक व कवी उपस्थित होते.

निमगाव वाघा (ता. नगर) येथील पै. नाना डोंगरे मागील तीस ते चाळीस वर्षापासून क्रीडा क्षेत्रात योगदान देत आहे. ग्रामीण भागातील खेळाडूंना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने ते विविध स्पर्धा घेत असतात. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक राष्ट्रीय कुस्तीपटू घडले असून, नवोदित खेळाडूंना चालना देण्याचे ते सातत्याने प्रयत्न करत आहे. जिल्हा तालिम संघाच्या माध्यमातून राज्यस्तरावर कुस्तीचे संघ व्यवस्थापक म्हणून देखील ते काम पाहत असतात. त्यांची क्रीडा क्षेत्रातील कार्य व योगदानाची दखल घेऊन त्यांना क्रीडा रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. पुरस्कार मिळाल्याबद्दल श्री. डोंगरे यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# गुणे आयुर्वेद रुग्णालयात धन्वंतरी जयंतीच्या मुहूर्तावर नव्या धन्वंतरी मूर्तीची विधिवत स्थापना



धन्वंतरी जयंतीच्या मुहूर्तावर गंगाधरशास्त्री गुणे रुग्णालय व महाविद्यालयाच्या उद्यानात संस्थेचे अध्यक्ष अरुण जगताप यांच्या हस्ते नव्या धन्वंतरी देवेतेच्या मूर्तीची स्थापना करण्यात आली. यावेळी सचिव डॉ.विजय भंडारी, सहसचिव सचिन जगताप, संचालक ज्ञानदेव पांडूळे, रत्नाकर कुलकर्णी, वैशाली ससे, प्राचार्य डॉ. दत्तात्रय लोडे, डॉ. सूरजसिंह ठाकुर, डॉ. समीर होळकर आदींसह सर्व प्राध्यापक.

नगर – गंगाधरशास्त्री गुणे रुग्णालय व महाविद्यालयात धन्वंतरी जयंतीच्या मुहूर्तावर व राष्ट्रीय आयुर्वेद दिनाचे औचित साधून महाविद्यालयाच्या उद्यानात नव्या धन्वंतरी देवेतेच्या मूर्तीची स्थापना करण्यात आली. धन्वंतरी स्तोत्राच्या सामुहिक पठणाने आयुर्वेद शास्त्र सेवा मंडळाचे अध्यक्ष अरुण जगताप यांच्या हस्ते धन्वंतरी देवेतेच्या मूर्तीची विधिवत पूजा करून स्थापना करण्यात आली.

यावेळी संस्थेचे सचिव डॉ.विजय भंडारी, सहसचिव सचिन जगताप, संचालक ज्ञानदेव पांडूळे, रत्नाकर कुलकर्णी, वैशाली ससे, महाविद्यालयचे प्राचार्य डॉ.दत्तात्रय लोडे, उपप्राचार्य डॉ. सूरजसिंह ठाकुर, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. समीर होळकर आदींसह सर्व प्राध्यापक, विधार्थी व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी अरुण जगताप म्हणाले, गुणे आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालयाला रुग्ण सेवेची मोठी वैभवशाली परंपरा आहे. स्व. गुणेशास्त्रींची शिकवण व विचारांवर येथे काम होत आहे. या महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना नव्याने उभारण्यात आलेली धन्वंतरी देवेतेची मूर्ती प्रेरणादायी ठरेल.

प्रास्ताविकात डॉ.दत्तात्रय लोडे म्हणाले, महाविद्यालयात स्थापनेपासून धन्वंतरी देवतेचे पूजन केले जात आहे. महाविद्यालयात असलेल्या आयुर्वेदिक वनस्पतींच्या सानिध्यात नव्या धन्वंतरी देवेतेच्या मूर्तीची स्थापना केल्याने या उद्यानाच्या सौंदर्यात भर पडली आहे. महाविद्यायात विद्यार्थ्यांना अधिक चांगल्या सोई देण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत.

यावेळी व्यवस्थापिका प्रतिभा भारदे, डॉ.निलेश बकाल, डॉ.गणेश लोखंडे, डॉ.अमित शिनगारे, डॉ.प्रविण जोशी, डॉ.तारकेश्वर वानखडे, डॉ.अंजली देशमुख, डॉ. पूर्णिमा जगताप, डॉ ए.टी.देशमुख, डॉ.नितीन जाधव व महाविद्यालय, रुग्णालयातील कर्मचारी उपस्थित होते.



कोठला येथील पार्किंग येथे ३ दिवसीय पैलवान चषक टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेत विजयी ठरलेला एच.एस.के. संघातील खेळाडू.

# पैलवान चषक टर्फ टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचा ‘एच.एस.के संघ’ ठरला मानकरी

नगर – कोठला येथील पार्किंग येथे ३ दिवसीय पैलवान चषक टर्फ टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धाचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेत १६ संघांनी सहभाग नोंदविला होता. या टूर्नामेंटमध्ये अंतिम सामना एच.एस.के संघ व के.जी सरकार संघ यांच्यात रंगला. यामध्ये पैलवान चषक २०२४ चा मानकरी एच. एस.के संघ ठरला.

संघमालक हाजी शमस खान यांना प्रथम २१ हजार २१२ रुपये व सन्मानचिन्ह प्रशस्तीपत्र देण्यात आले. द्वितीय के.जी सरकार संघाचे युसुप शेख ११ हजार १११ सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देण्यात आले. तृतीय हेड अ‍ॅण्ड टेल संघास ५ हजार ५५५ सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देण्यात आले. यावेळी उद्योजक अफजल शेख, असलम शेख, फरहान शेख, गुलाम शेख, अझर दादा, अयाज शेख, नितीन बुरला, फैयाज सय्यद, अब्दुल्ला खोकर, हर्षल कांबळे, सतीश सातपुते, मुस्ताक शेख, शाहरुख शेख, श्री. पुंडे, अकबरभाई मुंबईवाले, एहसान पार्टी, फैजल पैलवान, शाहिद पैलवान, शाहरुख जमजम, समीर बागवान, नईम सरकार, राजू भाई, फैरोज कुरेशी, फयाज केबलवाला, हाजी शमस, आफताब शेख, वसीम शेख, अजर शेख, सद्दाम शेख, आतिफ शेख, हाजी लाला, परवेज शेख, गुलाबभाई, जोयब शेख, शशी भाई आदीसह अफजलभाई फ्रेंड सर्कलचे पदाधिकारी उपस्थित होते.

या पैलवान चषक टर्फ टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेमध्ये मॅन ऑफ द मॅच देवीश बडे तर मॅन ऑफ द सिरीज हमजा सय्यद यांना देण्यात आले.

# नगरच्या नयना खेडकर हिने चीनमध्ये कुंग फू खेळात पटकाविले रौप्य पदक

### आंतरराष्ट्रीय शाओलिन वुशू महोत्सवात उत्कृष्ट कामगिरी



नगरच्या नयना खेडकर हिने चीनमध्ये कुंग फू खेळात पटकावलेल्या रौप्य पदकासह दिसत आहे.

नगर – मध्य चीनच्या हेनान प्रांतातील झेंगझोऊ या शहरामध्ये झालेल्या तेराव्या झेंग्झू आंतरराष्ट्रीय शाओलिन वुशू महोत्सवात नगरची खेळाडू नयना खेडकर हिने भारताचे प्रतिनिधित्व करत कुंग फू मध्ये रौप्य पदक पटकाविले.

झेंगझोऊ हे कुंग फू चे जन्मस्थान असलेले शहर आहे. या शहरात झालेल्या स्पर्धेत ५६ देशातील २,५६० खेळाडूंनी सहभाग नोंदवला होता. यामध्ये ४ ते ८२ वयोगटात स्पर्धा रंगली होती. नयना खेडकर या मुळच्या नगर शहरातील असून, त्या सध्या चीनमध्ये युनताई माउंटन इंटरनॅशनल कल्चर आणि मार्शल आर्ट्स स्कूलमध्ये थाई व कुंग फू या, सँडाचा सराव करत आहे. त्यांनी या महोत्सवात सहभागी होऊन उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले.

खेडकर या आंतरराष्ट्रीय पातळीवर खेळाडू म्हणून यशस्वी वाटचाल करत आहेत. सध्या गृहिणी असलेल्या लता खेडकर आणि निवृत्त पोलिस अधिकारी कै. निवृत्ती (एन.डी.) खेडकर यांच्या कन्या आहेत.

स्पर्धेच्या प्रारंभी ३० हजार कुंग फू चे खेळाडू असलेल्या विद्यार्थ्यांनी शाओलिन मंदिर ते उद्घाटन स्थळापर्यंत १३ किलोमीटरच्या मार्गावर शाओलिन कुंग फू चे धाडसी प्रात्यक्षिके सादर केली. १९९१ मध्ये तेथील सरकारच्या मान्यतेने शाओलिन वुशू महोत्सव सुरू झालेला असून, पर्यटन आणि सांस्कृतिक देवाणघेवाणसाठी दरवर्षी हा महोत्सव साजरा केला जातो. यामध्ये कुंग फू साहस आणि कंबोडियन-चिनी बॉक्सिंग शोकेस, कुंग फू प्रात्यक्षिके, सांस्कृतिक पर्यटन प्रकल्प आणि आंतरराष्ट्रीय मार्शल आर्ट या सारख्या विविध सांस्कृतिक उपक्रमाचा समावेश असतो.



जैन वात्सल्य संस्थेकडून दिवाळीनिमित्त नेहमीच्या किराणा साहित्याबरोबर फराळासाठी लागणारी विशेष सामुग्री, साड्यांचे सोनल चोरडिया यांच्या मासखमणापूर्तीनिमित्त वाटप करण्यात आले.

# जैन वात्सल्य संस्थेकडून दिवाळीनिमित्त विशेष उपक्रम

नगर – जैन वात्सल्य संस्थेने यावेळी दिवाळीच्या निमित्ताने एक विशेष उपक्रम राबवला आहे. दिवाळीच्या आनंदाचा आस्वाद गरजू बांधवांनाही घेता यावा, त्यांच्या जीवनात प्रकाशाचा एक किरण यावा, यासाठी संस्थेने या महिन्यात नेहमीच्या किराणा साहित्याबरोबर फराळासाठी लागणारी विशेष सामुग्रीही समाविष्ट केली आहे. याबरोबरच महिलांसाठी साड्यांचेही वाटप करण्यात आले.

हा वितरण सोहळा सोनल चोरडिया यांच्या हस्ते, त्यांच्या मासखमान पूर्ती निमित्त त्यांच्या मातोश्री सौ. कल्पना चोरडिया यांच्या उपस्थितीत झाला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले संतोष भंडारी (टाकळी ढोकेश्वर) यांनी संस्थेच्या या सेवाभावी कार्याचे कौतुक केले.

कार्यक्रमाच्या समारोपात ईश्वर बोरा, सचिव विजय गुगळे, विजय गुंदेचा, अशोक कोठारी, नूतन गांधी आदी सदस्य उपस्थित होते.

# हरदिन मॉर्निंग ग्रुपने केली निराधार व वंचित घटकातील ज्येष्ठांची दिवाळी गोड

### मिठाई व फराळचे वाटप

नगर – हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने निराधार व वंचित घटकातील ज्येष्ठ नागरिकांची दिवाळी गोड करण्यात आली. भिंगार व शहरातील विविध मंदिरांच्या ठिकाणी भेटी देऊन तेथे बसलेल्या निराधार घटकातील व्यक्तींना मिठाई व फराळचे वाटप करण्यात आले.

भिंगार येथील रोकडेश्वर हनुमान मंदिरातील निराधार ज्येष्ठ नागरिकांना मिष्टान्न भोजनाचे वाटप करुन मिठाई व फराळचे पाकिट भेट देण्यात आले. तसेच भिंगार येथील शैनेश्वर मंदिर, सर्जेपुरा येथील दक्षिण मुखी हनुमान मंदिर व माळीवाडा येथील शनी मारुती मंदिर येथील निराधार असलेल्या भिक्षेकरी यांना फराळ व मिठाईचे वाटप करण्यात आले.



हरदिन मॉर्निंग ग्रुपच्यावतीने निराधार व वंचित घटकातील ज्येष्ठांची दिवाळी मिठाई व फराळाचे वाटप करुन गोड करताना महेश नागरी सहकारी पतसंस्थेचे चेअरमन नंदकुमार झंवर, ग्रुपचे अध्यक्ष संजय सपकाळ आदी.

महेश नागरी सहकारी पतसंस्थेचे चेअरमन नंदकुमार (मुन्नाशेठ) झंवर व हरदिनचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ यांच्या हस्ते मिठाईच्या पाकिटांचे वितरण करण्यात आले.

यावेळी रमेश वराडे, मेजर दिलीप ठोकळ, जहीर सय्यद, सुमेश केदारे, सर्वेश सपकाळ, सचिन चोपडा, दिलीप गुगळे, मनोहर दरवडे, रतन मेहेत्रे, हरीश साळुंके, दीपक धाडगे, अशोकराव पराते, दीपक बडदे, अभिजीत सपकाळ, ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज अनावडे, प्रवीण परदेशी, शेषराव पालवे, विलासराव आहेर, गोरक्षनाथ वामन, अविनाश जाधव, मेजर विनोद खोत, संपतराव बेरड, रमेश खंडेलवाल, सुनील कसबे आदी उपस्थित होते.

संजय सपकाळ म्हणाले की, दिवाळी सण आनंद लुटण्याचा नव्हे आनंद वाटण्याचा सण आहे. या भावनेने निराधारांची दिवाळी गोड करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. ग्रुपच्या माध्यमातून सातत्याने सामाजिक योगदान देऊन वंचितांना आधार देण्याचे कार्य सुरु आहे. वंचितांच्या अंगणात सामाजिक सेवेचा दिवा प्रज्वलीत करुन समाज प्रकाशमान करण्यासाठी हरदिनचे कार्य सुरु असल्याचे त्यांनी सांगितले.

नंदकुमार झंवर यांनी दिवाळी हा अंधकार दूर करणारा सण असून, वंचितांच्या जीवनात प्रकाश निर्माण करण्याचे कार्य हरदिनच्या सदस्यांनी केले आहे. वंचितांची दिवाळी गोड करण्यासाठी राबविण्यात आलेला उपक्रम कौतुकास्पद असल्याचे त्यांनी सांगितले.

या उपक्रमासाठी सलाबत खान, पोपटराव भांड, सखाराम अळकुटे, दशरथ मुंडे, शिवान शिंदे, किरण फुलारी, सुभाष पेंडुरकर, अविनाश पोतदार, दिलीप बोंदर्डे, कुमार धतुरे, संजय भिंगारदिवे, अजय आठवले, प्रशांत भिंगारदिवे यांचे परिश्रम लाभले. तसेच गरजू लोकांना जेवणाचे डबे पोहचविण्याचे काम करणाऱ्या भिंगार येथील उन्नती सेवाभावी संस्थेला मिठाई व फराळचे पाकिट उपलब्ध करुन ते गरजूंपर्यंत पोहचविण्यात आले.

# शहर विकासाच्या चक्राच्या गतीसाठी सर्वांनी एकेक पॅडल मारणे आवश्यक

### आ.संग्राम जगताप यांचे प्रतिपादन; नगर विकास यात्रे दरम्यान इंडस्ट्रीयल इस्टेटमधील उद्योजकांशी संवाद




महायुतीचे उमेदवार आ.संग्राम जगताप यांनी इंडस्ट्रीयल इस्टेटमधील उद्योजकांशी संवाद साधून निवडणुकीतील आपली भूमिका मांडली. समवेत इंडस्ट्रीयल इस्टेटचे चेअरमन अरविंद गुंदेचा, व्हाईस चेअरमन निलेश मेहेर, संचालक संतोष बोथरा, संतोष बोरा, गणेश भोसले, प्रकाश भागानगरे, संजय चोपडा आदी.

नगर – औद्योगिक क्षेत्राल चालना देण्यासाठी महायुती सरकारने नगरमध्ये ६०० एकरच्या जागेसह नव्या एमआयडीसीला परवानगी दिली आहे. त्यामुळे नवे मोठमोठी औद्योगिक प्रकल्प नगरमध्ये आणण्याचे प्रयत्न सुरु आहेत. हा प्रकल्प नगरसाठी बुस्टर डोस ठरणार असून मोठ्याप्रमाणात लहान उद्योगांना चालना व रोजगार वाढणार आहे. इंडस्ट्रीयल इस्टेट या औद्योगिक वसाहतीचे अनेक प्रश्न व समस्या मांडल्या गेल्या. त्यातील अनेक सोडवल्या आहेत. अंतर्गत रस्ते काँक्रीटचे झाली असल्याने येथे वर्दळ वाढणार आहे. शहराचा चहूबाजूंनी सर्वांगीण विकास होत असल्याने चांगल्या नागरी सुविधा मिळत असल्याने शहरात लोकवस्ती वाढत आहेत. या विकासाच्या चाकाची गती वाढवण्यासाठी सर्वांनी एकेक पॅडल मारणे आवश्यक आहे. यासाठी या निवडणुकीत मला पुन्हा एकदा आपला आशीर्वाद द्यावा, असे आवाहन महायुतीचे उमेदवार आ.संग्राम जगताप यांनी केले.

विधानसभा निवडणुकीचे महायुतीचे उमेदवार संग्राम जगताप यांनी नगर विकास यात्रेत इंडस्ट्रीयल इस्टेट मधील उद्योजकांशी संवाद साधून निवडणुकीतील आपली भूमिका मांडली. यावेळी अहमदनगर इंडस्ट्रीयल इस्टेटचे चेअरमन अरविंद गुंदेचा यांनी आ.संग्राम जगताप यांचे स्वागत करून सत्कार केला. यावेळी व्हाईस चेअरमन निलेश मेहेर, संचालक संतोष बोथरा, मेहुल भंडारी, संतोष बोरा, नितीन पटवा व सतीश बोरा, माजी उपमहापौर गणेश भोसले, माजी नगरसेवक प्रकाश भागानगरे व संजय चोपडा आदींसह उद्योजक उपस्थित होते.

यावेळी अरविंद गुंदेचा यांनी संग्राम जगताप यांना तिसऱ्यांदा आमदार करण्यासाठी सर्व उद्योजक आपल्या परिवार व कर्मचाऱ्यांसह त्यांच्या मागे उभे असल्याची ग्वाही दिली.

प्रास्ताविकात संतोष बोरा यांनी इस्टेटमध्ये आ.संग्राम जगताप यांनी केलेल्या कामांची माहिती दिली. नितीन पटवा यांनी आभार मानले.

# नॉर्थ महाराष्ट्र रिजनल टेबल टेनिस स्पर्धेत किरण पवार टेबल टेनिस अकॅडमीचे यश




नॉर्थ महाराष्ट्र रिजनल टेबल टेनिस स्पर्धेत यशस्वी झालेल्या किरण पवार टेबल टेनिस अकॅडमीच्या खेळाडूंचा सत्कार करण्यात आला.

नगर – धुळे येथे २६ व २७ ऑक्टोबर पार पडलेल्या नॉर्थ महाराष्ट्र रिजनल टेबल टेनिस स्पर्धेत किरण पवार टेबल टेनिस अकॅडमीच्या खेळाडूंनी यश मिळविले.

मुलींच्या अकरा वर्ष वयोगटात मिनसा तांबटकर हिने रौप्य पदक पटकाविले (द्वितीय क्रमांक) तसेच मुलांच्या अकरा वर्षे वयोगटात अद्वैत जोशी याने ब्राँझ पदक पटकाविले. (तृतीय क्रमांक)१५ वर्ष वयोगट मुलींच्या गटात सिया सुराणा हिने ब्राँझ पदक पटकाविले. (तृतीय क्रमांक) तसेच १७ वर्षे मुलांच्या गटात विराज कराचीवाला याने चौथ्या क्रमांकाचे बक्षीस पटकावले. सर्व विजयी खेळाडूंना ट्रॉफी व रोख रक्कम बक्षीस म्हणून देण्यात आले.

या स्पर्धेत नगर बरोबरच नाशिक, धुळे, जळगाव, नंदुरबार या ठिकाणच्या खेळाडूंनी सहभाग नोंदविला होता. या स्पर्धेत शशिकांत डव्हारे, अथर्व हरबा, अनुवेद गाडेकर, अभिजीत ससाने, प्रेम भोसले, अब्दुल तांबटकर, कनक उंडे, श्री. कोडम या खेळाडूंनी उत्कृष्ट खेळ केला. सर्व खेळाडूंचे टेबल टेनिस प्रेमींनी अभिनंदन केले.

सर्व खेळाडूंना एन.आय.एस. मार्गदर्शक, राष्ट्रीय ब्राँझ पदक विजेते, क्रीडा व योग शिक्षक शिक्षक किरण पवार सर यांचे मार्गदर्शन लाभले.

# ‘स्वर दीपावली कार्यक्रमा’चे सावेडीत ३० ऑक्टोबरला आयोजन

### सप्तसूर परिवारातील डॉक्टरांची सुरमयी पहाट रंगणार



नगर – शहरातील सप्तसूर परिवाराच्या वतीने बुधवारी (३० ऑक्टोबर) पहाटे ६:३० वाजता स्वर दीपावली हा सुमधुर मराठी व हिंदी गाण्यांचा कार्यक्रम सावेडी येथील माऊली संकुल सभागृहात रंगणार आहे. संगीत, गायन क्षेत्रात योगदान देणारे अहिल्यानगर मधील डॉक्टर आपल्या कलेचे सादरीकरण या कार्यक्रमात करणार आहेत. हा कार्यक्रम सर्वांसाठी निशुल्क असून, कलाप्रेमी नागरिकांना या कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन सप्तसूरच्या वतीने करण्यात आले आहे.

गायन क्षेत्राची आवड असलेल्या डॉक्टर मंडळींनी एकत्र येऊन सप्तसूर या संस्थेची अधिकृत नोंदणी केलेली असून, या संस्थेच्या माध्यमातून विविध संगीत मैफलचे आयोजन केले जाते. दरवर्षी संस्थेच्या वतीने दिवाळी पहाट कार्यक्रम घेण्यात येत असून, या पार्श्वभूमीवर स्वर दीपावलीचा कार्यक्रम होणार आहे.

अनेक वर्षापासून डॉक्टर मंडळींचा गायनाचा रियाज सुरु असून, विविध कार्यक्रम शहरात घेतले जातात. बुधवारी होणाऱ्या स्वर दीपावली कार्यक्रमात कलाकार डॉ. विलास जोशी, डॉ. अभिजीत पाठक, डॉ. योगिनी वाळिंबे, डॉ. प्रकाश टेकवाणी, डॉ. स्मिता केतकर, डॉ. बाळासाहेब देवकर, सौ. पल्लवी जोशी, डॉ. शिरीष कुलकर्णी, डॉ. प्रीती नाईक, डॉ. नीरज करंदीकर, सौ. दीप्ती करंदीकर, डॉ. रोहिणी काळे, डॉ. अविनाश वारे, डॉ. दीपा मोहोळे, डॉ. सरोज भिडे, डॉ. संगीता कुलकर्णी, डॉ. सचिन पानपाटील, सौ. ज्योती दीपक, डॉ. रेशमा चेडे, डॉ. सीमा गोरे, डॉ. प्राची पाटील, डॉ. सत्तार सय्यद गायन करणार आहेत.

वादक म्हणून दिलावर शेख, सत्यजित सराफ, डॉ. गीता करंदीकर, अजित गुंदेचा, अजय साळवे, ओंकार साळवे, ऋतुजा पाठक, तुषार दुबे यांची साथसंगत लाभणार आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.



**बालचमूंची किल्ला बनवण्याची लगबग**

दिवाळी म्हटलं की बालचमुनची किल्ला बनवायची लगबग असेच केडगाव येथे आयोध्यानगर मध्ये मन्यार कुटुंबातील बालचमू राजीक मन्यार, मोहम्मद अली मन्यार, मुव्हीज मन्यार, अक्सा मन्यार किल्ला बनवण्यात मग्न (छाया – समीर मन्यार)



टाईम्स अप्लॉड मीडियाने जिंजर हॉटेलमध्ये आयोजित केलेल्या कार्यक्रमात विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्यासह बी के डॉ. दीपक हरके उपस्थित होते. यावेळी मीडियाचे सीईओ तौसिफ पटेल, विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे व बी के डॉ. दीपक हरके.

# लक्ष्मीपूजन कधी करावे?

३१ ऑक्टोबर रोजी दुपारी ३ वाजून ५२ मिनिटांनी अमावस्येचा प्रारंभ होत असून अमावस्या समाप्तीची वेळ १ नोव्हेंबर सायंकाळी ६ वाजून १६ मिनिटे अशी आहे. बऱ्याच लोकांना प्रश्न पडला असेल की लक्ष्मीपूजन कधी करावे? मी मित्रांनो तुम्हाला एक सांगेन की ३१ तारखेला लक्ष्मीपूजन करा कारण की हिंदू धर्मशास्त्रानुसार अश्विन महिन्याच्या अमावस्येला सायंकाळी गोरज मुहुर्तावर लक्ष्मीपूजन केले जाते. जर तुम्हाला काही शंका असेल तर तुम्ही मला संपर्क करू शकता.

**– श्रीपाद शहाणे, अहिल्यानगर. मो.८०८७००७७६५**

# कापडबाजार जैन मंदिरात दीपावली निमित्त विशेष अंगी

नगर – दिपावली पर्वानिमित्त जैन मंदिर कापडबाजार येथे साध्वीजी भगवंत ऋजूप्रज्ञाश्रीजी म.सा. या दररोज सकाळी ९ वाजता उपाश्रयामध्ये उत्तरायध्यन सूत्र व भगवान महावीरांची अंतिम देशना वाचणार आहेत. याशिवाय सकाळी स्नात्रपूजन होणार आहे. तसेच दोन्ही मंदिरात राजस्थान येथील अंगी कारागीर हे भगवानची विशेष, मनमोहक व सुंदर अंगरचना (अंगी) करणार आहे. अंगी धनतेरसपासून भाऊबीजेपर्यंत दररोज सायंकाळी करणार आहेत. तसेच २ नोव्हेंबर रोजी दीपावली पाडव्यानिमित्त सकाळी ६ वाजता कापडबाजार उपाश्रयामध्ये गौतम स्वामींची रास वाचणार आहेत.

तरी सर्वांनी दर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन मुख्य ट्रस्टी सुभाष मुथा व ट्रस्टी मंडळाने केले आहे.

**बंगळूरूच्या प्रतीक खंडेलवालला एका अपघातामुळे अपंगत्व आलं. मात्र यामुळे तो डगमगला नाही. अपंगांच्या अडचणी त्याच्या लक्षात आल्या आणि मग त्याने रॅम्प माय सिटी ही कंपनी सुरू केली. या द्वारे तो अपंगांचं जगणं सुसह्य करण्याचा प्रयत्न करतो. त्याच्या जिद्दीची कहाणी...**

# जिद्दी प्रतीक

प्रतीक खंडेलवाल इतरांप्रमाणे सरळ, साधं आयुष्य जगत होता. २०१४ पर्यंत सगळं चांगलं चाललं होतं. आयटी इंजिनिअर असणारा प्रतीक बांधकाम सुरू असणाऱ्या इमारतीवरून पडला. या अपघातात त्याचा कंबरेखालचा भाग लुळा पडला आणि त्याला व्हिलचेअर जवळ करावी लागली. मात्र यामुळे तो निराश झाला नाही. अपघातातून सावरल्यावर त्याने रॅम्प माय सिटी ही कंपनी सुरू केली. अपंग तसंच जेष्ठांना शहरांमध्ये फिरता यावं यासाठी ही कंपनी सर्व सोयी उपलब्ध करून देते. अपघातानंतर प्रतीकने शारीरिक थेरेपी घेतली. या घटनेनंतर काहींनी प्रतीकला दया दाखवली तर काहींनी त्याच्यापासून दूर राहणं पसंत केलं. परिस्थिती स्वीकारल्यानंतर प्रतीकला व्हिलचेअर पुरतं मर्यादित राहायचं नव्हतं. त्याला आयुष्य सीमित ठेवायचं नव्हतं. पाठीच्या कण्याला झालेल्या दुखापतीमुळे प्रतीकला बराच त्रास सहन करावा लागला. पण त्याने या सगळ्या आव्हानांवर मात करायचं ठरवलं.

**अचिव्हर**

या अपघातातून सावरल्यावर त्याच्या एक गोष्ट लक्षात आली, ती म्हणजे त्याला नेहमीसारखं बाहेर जाता येत नव्हतं. आवडत्या रेस्टॉरंटमध्ये किंवा खाण्याच्या स्टॉलवर जाणं त्याच्यासाठी खूपच कठीण बनलं होतं. त्याला अपंगांच्या समस्यांची जाणीव झाली आणि मग त्याने ही कंपनी सुरू केली. २०२० मध्ये रॅम्प माय सिटीची सुरूवात झाली. आत्तापर्यंत त्याच्या कंपनीतर्फे बंगळूरू, गोवा, मुंबई, गुरूग्रामसारख्या ठिकाणी ५३० हून अधिक रॅम्प्स बसवण्यात आले आहेत.




आपल्या देशात अपंगांबाबत बरीच उदासिनता दिसते. मोठी हॉटेल्स, थिएटर्स, बँका यापैकी कुठेही अपंगांसाठी सुविधा नसतात. प्रतीकला ही परिस्थिती बदलायची आहे. त्यासाठी त्याचे प्रयत्न सुरू आहेत. प्रतीकला लोकांमध्ये जागरूकता निर्माण करायची आहे. अपंगांना त्यांचे हक्क मिळवून द्यायचे आहेत. सुविधा नसल्यामुळे अपंगांना घरातच बसून रहावं लागतं. पण प्रतीकला हे सगळं बदलायचं आहे. स्वतःच्या अनुभवातून त्याने रॅम्प माय सिटीची सुरूवात केली आहे. त्याच्या जिद्दीला सलाम केलाच पाहिजे.

# जोश

## शेर की जुबानी

* सुकून की बात मत करो
ऐ मेरे दोस्त,
बचपनवाला
इतवार अब नहीं आता।

* हजारो चेहरों में एक तुम्ही पर
मर मिटे हैं वरना,
ना चाहतों की कमी थी,
और ना चाहने वालों की।

* कब तक रह पाओगे आखिर यूँ दूर हमसे,
मिलना पडेगा कभी ना कभी, जरूर हमसे,
नजरें चुराने वाले ये बेरूखी है कैसी.,
कह दो अगर हुआ है कोई कसूर हमसे।

## व्हॉट्स न्यू?

### सॅमसंगची स्मार्ट रिंग



तंत्रज्ञानात सातत्याने नवनवे बदल होत आहेत. स्मार्टफोन, स्मार्टवॉचनंतर आता स्मार्ट रिंग बाजारात उपलब्ध झाली आहे. सॅमसंगने भारतात 'गॅलेक्सी रिंग' सादर केली असून या रिंगमध्ये आपली आरोग्यविषयक माहिती सेव्ह करता येते. यासोबतच यात अन्य फीचर्सही आहेत. 'गॅलेक्सी रिंग' नऊ आकारांमध्ये उपलब्ध असून तिचं वजन फक्त तीन ग्रॅम एवढं आहे. टायटॅनियम ब्लॅक, टायटॅनियम सिल्व्हर आणि टायटॅनियम सिल्व्हर अशा तीन रंगांमध्ये ती उपलब्ध आहे. ही रिंग एकदा चार्ज केल्यानंतर सात दिवसांचा बॅटरी बॅक अप देते. यात अनेक सेंसर्स आहेत. तसंच ती वॉटरप्रूफही आहे.


## बी अॅलर्ट

### ऑनलाईन शॉपिंग करताय?

दिवाळीमध्ये ई कॉमर्स साईट्सवर शॉपिंग फेस्टिवल्सची धूम असते. मग आपल्यालही सवलतीत वस्तू खरेदी करण्याचा मोह आवरत नाही. मात्र अशा पद्धतीने ऑनलाईन शॉपिंग करताना फसवणूक होण्याचा धोकाही असतो. बऱ्याच ऑफर्स आणि सवलती असतील तर फसवणूक होऊ शकते. बाय वन गेट वन फ्रीच्या जाळ्यातही तुम्ही अडकू शकता. कूपन तसंच रिवॉर्डच्या नावाखाली तुमची फसवणूक होऊ शकते. बनावट ॲप्स तसंच वेबसाईट्सच्या माध्यमातून तुम्ही फसवले जाऊ शकता. त्यामुळे कोणतीही खरेदी भरवशाच्या साईटवरूनच करा. अनोळखी लिंकवर क्लिक करू नका. कुठेही आपली माहिती नोंदवू नका. अशा पद्धतीने थोडी काळजी घेऊन तुम्ही ऑनलाईन फसवणूक टाळू शकता.

## ॲप वर्ल्ड

### यू ट्यूबने कमाई करताय?



यू ट्यूबवर अनेकांची चॅनेल्स आहेत. तुम्हीही अनेक चॅनेल्स आवडीने बघत असाल. काही चॅनेल्सचे काही लाख सबस्क्रायबर्स असतात तर काहींचे काही हजार. यू ट्यूब चॅनलमार्फत कमाईही करता येते. तुम्ही ५०० सबस्क्रायबर्सद्वारेही कमाई सुरू करू शकता. सुपर चॅट, थँक्स, स्टीकर्सचा वापर करून तुम्ही कमाई करू शकता. जाहिरातींच्या माध्यमातून पैसे कमावण्यासाठी तुमच्याकडे किमान १००० सबस्क्रायबर्स असायला हवेत. यासोबतच तुम्ही अस्सल कंटेंट दाखवायला हवा. बनावट कंटेंटद्वारे तुम्हाला कमाई करता येणार नाही. त्यामुळे तुमचा कंटेंट अस्सल आहे, याची खात्री करून घ्या.

## सोशल मीडिया

### जी मेलचा कॉन्फिडेन्शियल मोड




जी मेलचा वापर सर्व जण करतात. जी मेलवरून तुम्ही महत्त्वाची किंवा गोपनीय माहिती पाठवत असाल तर तुम्हाला जी मेलच्या कॉन्फिडेन्शियल फीचरची माहिती असायला हवी. अर्थात हा मोड सगळ्यांसाठी उपलब्ध नाही. एखादी संस्था हा मोड ॲक्टिव्ह करू शकते. ॲडमिनिस्ट्रेटर अकाउंटमध्येच तुम्ही स्टेप्स फॉलो करून हा मोड ॲक्टिव्ह करू शकता. यासाठी ॲडमिन कन्सोलमध्ये मेन्यूवर क्लिक करा. यानंतर जीमेल युजर सेटिंग्जमध्ये जा. स्क्रॉल करून कॉन्फिडेन्शिलय मोडमध्ये जा. हा मोड ऑन करा. आता तुम्ही गोपनीय माहिती सुरक्षीतरित्या पाठवू शकता.

# बारावीनंतर...

दोस्तांनो, सध्याच्या काळात फक्त बारावी किंवा पदवीधर होऊन चालत नाही. त्याच्यासोबत नवं कौशल्य आत्मसात करावं लागतं. चांगली नोकरी मिळवण्यासाठी किंवा करिअर घडवण्यासाठी काहीतरी वेगळं करावं लागतं. तुम्हीही बारावीनंतर काहीतरी वेगळं करण्याच्या विचारात असाल तर या डिप्लोमा कोर्सचा विचार करता येईल.

* बारावीनंतर उत्तम करिअर घडवण्यासाठी तुम्ही हॉटेल मॅनेटमेंटचा विचार करू शकता. हॉटेलिंगच्या क्षेत्रात आज असंख्य संधी आहेत. अनेक संस्थांमधून हॉटेल मॅनेजमेंट शिकवलं जातं. तुम्ही या संस्थांची माहिती काढून डिप्लोमाला प्रवेश घेऊ शकता.

* आज इव्हेंट मॅनेंटमेंटचीही प्रचंड चलती आहे. इव्हेंट मॅनेजमेंटचा कोर्स करून चांगलं भविष्य घडवता येईल. आज अनेक इव्हेंट्स आयोजित केले जातात. या इव्हेंट्सच्या आयोजनाची जबाबदारी तुम्ही घेऊ शकता.

**करिअर**

* तुमच्याकडे सौंदर्यदृष्टी असेल तर इंटिरिअर डिझायनिंगचा विचार करता येईल. यासोबतच आज ज्वेलरी डिझायनर्सनाही बरीच मागणी आहे. वेगवेगळ्या प्रकारची ज्वेलरी कॅरी केली जाते. ती ज्वेलरी घडवून तुम्ही उत्तम उत्पन्न मिळवू शकता. यासोबतच डिप्लोमा इन रिटेल मॅनेजमेंट, डिप्लोमा इन ऑर्गनायझेशन मॅनेजमेंट, डिप्लोमा इन हॉस्पिटॅलिटी अँड टूरिझम, मार्केटिंग अँड ॲडव्हरटायजिंग आणि ट्रॅव्हल अँड टूरिझम यांसारख्या विषयांमध्ये तुम्ही डिप्लोमा करू शकता.





# थंडीत घ्या केसांची काळजी

दिवाळी तोंडावर आली आहे. दिवाळीसोबतच आगमन होईल ते गुलाबी थंडीचं. थंडी कितीही हवीहवीशी वाटली तरी त्यासोबतच त्वचेच्या आणि केसांच्या समस्याही उद्भवतात. त्वचा कोरडी पडते. केस रुक्ष होतात, केसांत कोंडा होतो. त्यामुळे थंडीत त्वचा आणि केसांची काळजी ही घ्यावीच लागते. केसांमधला ओलावा टिकवून ठेवण्यासाठी तुम्ही काही उपाय करू शकता.

* खोबरेल तेल हे या काळात वरदान ठरू शकतं. हे तेल नैसर्गिक मॉईश्चरायझरचं काम करतं. फुटलेल्या ओठांपासून कोरड्या केसांपर्यंत कशातही जीव ओतण्याचं काम हे खोबरेल तेल करतं. त्यामुळे खोबरेल तेल थोडं गरम करून केसांना लावा. आठवड्यातून किमान एकदा तरी हा उपाय करा.

* तुम्ही हेअर मास्कही तयार करू शकता. कोरफड, मध तसंच कोणतंही तेल घ्या. यापासून हेअर मास्क तयार करा. आठवड्यातून एकदा लावा.

**ग्रूमिंग**

* तुमच्या फ्रीजमधला मायोनीज सॉस कमाल करू शकतो. या सॉसमध्ये अमिनो ॲसिड्स आणि फॅटी ॲसिड्स असतात. मायोनिज कंडिशनर म्हणून काम करतो. केस ओले करून त्यावर मायोनीज लावा. साधारण १५ मिनिटांनी शँपूने धुवून टाका.

* तांदूळ भिजवलेल्या पाण्याचा वापर करता येईल. शँपूने केस धुतल्यानंतर या तांदुळ भिजवलेल्या पाण्याने केस धुवून टाका. साधारण दोन मिनिटं थांबा आणि पुन्हा स्वच्छ पाण्याने केस धुवा.

# फॅशन लग्नसराईतली...

दोस्तांनो, दिवाळीनंतर लग्नांची धामधूम असते.तुमच्याही मित्रमैत्रिणींची, भावंडांची लग्न असतील. लग्नात धमाल तर केलीच पाहिजे. आता तर मेहंदी, संगीत, हळदीसारखे विविध सोहळे असतात. प्रत्येक सोहळ्यासाठी पारंपरिक पोशाख हवाच. स्टाईल आणि पारंपरिकता यांचा मेळ साधत तुम्हीही मस्त फॅशन करू शकता. लग्नसमारंभासाठीच्या या स्टायलिंग टिप्स...



* थोडं हटके आणि स्टायलिश दिसायचं असेल तर कुर्त्यावर लेअरिंग करता येईल. छान नक्षीकाम केलेला क्रीम कुर्ता घ्या. त्यावर लांब बंदगळा कॅरी करा. चुडीदार कुर्ता आणि बंदगळा यात तुम्ही भाव खाऊन जाल.

* साधेपणातही स्टाईल जपता येते. थोडं नक्षीकाम असणारा बेज रंगाचा कुर्ता आणि जोधपुरी पँट कॅरी करा. त्यावर कोल्हापुरी चप्पल घाला. यात तुम्ही नक्कीच उठून दिसाल. हा पेहराव कोणत्याही ऑकेजनची शान ठरेल.

**फॅशन पॅशन**

* प्रिंटेड कुर्ता कोणत्याही कार्यक्रमात शोभून दिसतो. त्यामुळे छानसा प्रिंटेड कुर्ता विकत घ्या. साखरपुडा असो किंवा रिसेप्शन, या प्रसंगी तुम्ही प्रिंटेड कुर्ता घालू शकता. प्रिंटेड कुर्त्यावर बेज रंगाची पँट घालता येईल.

* लग्न सोहळ्यात शेरवानीला बरीच मागणी असते. बरीच मुलं शेरवानी घालून मिरवतात. या सगळ्यांमध्ये उठून दिसायचं असेल तर तुम्ही वेगळा विचार करा. थंडीत वेलवेटचे कपडे घालता येतील. कुर्त्यावर गडद रंगाचं वेलवेटचं जॅकेट घाला. त्यावर लेदरच्या काळ्या रंगाच्या लोफर्स घालता येतील.

* फार प्रयोग करायचे नसतील तर साधाचा ब्लॅक कुर्ता घाला. धोती पँटवर हा कुर्ता शोभून दिसेल. त्यावर काळ्या सँडल घाला. रिसेप्शनसाठी हा लूक बेस्ट .

# रम्य ते समुद्रकिनारे

मित्रांनो, समुद्रकिनाऱ्यावरच्या भटकंतीची मजा काही औरच असते. समुद्रकिनारा म्हटला की आपल्या डोळ्यांसमोर गोवा आणि कोकण येतं. गोवा आणि कोकणातले समुद्रकिनारे रम्य आहेतच, मात्र आपल्या देशातले अन्य समुद्रकिनारेही स्वच्छ आणि सुंदर आहेत. तुम्ही गोवा आणि कोकणात गेला असाल. पण पुन्हा समुद्रकिनाऱ्यांची सैर करण्याची इच्छा असेल तर या ठिकाणांचा विचार करायला काहीच हरकत नाही.

* पुद्दुचेरीचा ईडन बीच खूप रेखीव आणि सुंदर आहे. इथल्या समुद्राची निळाई डोळ्यात भरून घेण्यासारखीच. द आर्ट अँड क्राफ्ट व्हिलेज आणि द पॅरडाईज बीच या दोन पर्यटन स्थळांच्या मध्ये ईडन बीच आहे. इथे नारळाची झाडं आहेत. या बीचवर फिरताना खूप मजा येईल.

**भटकंती**

* पुरी हे ठिकाण जगन्नाथाच्या मंदिरासाठी प्रसिद्ध आहे. तसंच पुरीमध्ये सुंदर समुद्रकिनाराही आहे. अत्यंत स्वच्छ आणि सुंदर असा हा समुद्रकिनारा तुमच्या मनात घर करून राहील.

गुजरातमध्ये शिवराजपूर बीच आहे. द्वारकेपासून अवघ्या १२ किलोमीटर अंतरावरचं हे ठिकाण अनोखं आहे. इथे तुम्हाला डॉल्फिन्सचं दर्शन घडू शकतं.

दीवमधला घोघला बीचही प्रसिद्ध आहे.



इथली सोनेरी वाळू आणि निळाशार समुद्र पर्यटकांना आकर्षित करतो.

# फ्लॉवरचं भरीत

थंडीत फ्लॉवरची आवक मोठ्या प्रमाणावर होते. फ्लॉवरची भाजी आपण नेहमीच खातो. चवीत थोडा बदल हवा असेल तर तुम्ही फ्लॉवरचं भरीत करू शकता. झटपट होणारं हे भरीत तुमच्या जेवणाची लज्जत वाढवेल.


**साहित्य** : एक फ्लॉवर, अर्धा कप मटार, दोन टोमॅटो, एक कांदा, सात लसूण पाकळ्या, आल्याचा तुकडा, चार हिरव्या मिरच्या, लिंबाचा रस एक चमचा, अर्धा चमचा हळद, एक चमचा तिखट, थोडी राई, जीरं, चमचाभर बडिशेप, गरम मसाला, तेल, मीठ आणि कोथिंबिर.



**कृती** : फ्लॉवरचे बारीक तुकडे करून घ्या. कांदा आणि टोमॅटोही चिरून घ्या. गॅसवर कढई ठेवा. त्यात थोडं तेल घाला. तेल तापल्यावर राई घाला. राई तडतडली की जीरं घाला. मग कांदा घालून परतून घ्या. आलं-लसूण वाटून घ्या. कांदा सोनेरी झाला की त्यात आलं-लसूण पेस्ट घालून परता. मिरच्यांचे तुकडे घाला. मग हळद, तिखट, गरम मसाला, बडिशेप घाला. परतून घ्या. यानंतर टोमॅटो घाला. टोमॅटो शिजल्यावर त्यात फ्लॉवर आणि मटार घाला. मध्यम आचेवर शिजवून घ्या. फ्लॉवर आणि मटार शिजल्यावर मॅशरने मॅश करून घ्या. लिंबू पिळा. दोन मिनिटं शिजवा. गॅस बंद करून वरून कोथिंबिर घाला. हे भरीत पोळी किंवा पराठ्यासोबत छान लागेल.

**झटपट रेसिपी**

# वयात अंतर आहे...



मी २७ वर्षांची तरुणी असून एका कंपनीत उच्चपदस्थ अधिकारी आहे. माझं एका मुलावर प्रेम आहे. पण तो माझ्याहून पाच वर्षांनी लहान आहे. आम्ही शेजारी असून लहानपणापासून एकमेकांना ओळखतो. आमचे कुटुंबिय हे नातं स्वीकारण्याची शक्यता तशी कमी असली तरी या नात्याचा गांभीर्याने विचार करावा असं मला वाटतं. या मुलाचंही माझ्यावर प्रेम असावं. हा मुलगा २२ वर्षांचा असून त्याचं शिक्षण पूर्ण व्हायचं आहे. त्याला मास्टर्स करायचं आहे. मला हा मुलगा आवडतो. अशा परिस्थितीत मी काय करू?

**उत्तर** : वयात अंतर असूनही आनंदाने संसार करणारी बरीच जोडपी पहायला मिळतात. अशा नात्यांमध्ये दोघांनीही एकमेकांना समजून घ्यायला हवं. दुसरं म्हणजे तुला या मुलाबद्दल फक्त आकर्षण वाटतं का हे खरंच प्रेम आहे, हे आधी ठरवून घे. या मुलाचंही तुझ्यावर प्रेम असल्याचं तू गृहित धरलं आहेस. त्याला तुझ्याबद्दल नेमकं काय वाटतं हे आधी जाणून घे. याबाबत त्याच्याशी बोल. त्यालाही तुझ्याबद्दल प्रेम वाटत असेल तर पुढे जाता येईल. तू आयुष्यात यशस्वी आहेस. पण या मुलाचं शिक्षण सुरू आहे. त्यामुळे त्यालाही करिअर घडवायचं असेल. म्हणूनच त्याच्या मनातलं जाणून घे. गरज पडल्यास समुपदेशकांची मदत घे.

**मॅच मेकिंग**

## 'सिद्धार्थ वाणी'



उपप्रवर्तक श्री सिद्धार्थमुनीजी म.सा. तथा महासतीजी डॉ. सौम्याश्रीजी म.सा. आदि ठाणा ३ इनका चातुर्मास सावेडी स्थानक मे विराजमान है ।

### उत्तरध्याय सूत्र

* **सहविसा(२६)व्या** अध्ययनात समाचारिचे वर्णन आहे. समाचारिचा अर्थ आहे, आचार व व्यवहार. तीर्थंकरांनी सांगितेले आणि थोर लोकांनी केलेले उपक्रम वृत आहेत. या अध्यायात साधूच्या जीवनातील दहा प्रकारचे ओघ समाचार आणि काल-विभाग समाचार (अहोराप्रचार्य) यांचे वर्णन आहे. ज्याद्वारे साधू त्यांचे आणि एकमेकांचे वर्तन, आचरण आणि कर्तव्ये पाळतात. साधू उपाश्रयातून जाताना व येताना गुरुची परवानगी घ्यावी. दिवस आणि रात्रीच्या पहिल्या भागात स्वयंअध्ययन दुसऱ्या भागात ध्यान आणि चौथ्या भागात स्वयंअध्ययन करणे. हे फक्त साधुसाठीच नाही तर भक्तासाठीही आहे. त्यानुसार ती समजून घेतली पाहिजे. भक्तही त्या ठिकाणी प्रवेश करताना निसा बोलतो. सत आल्यावर उभा राहतो. प्रवचनाच्या वेली त्यांच्याजवळ बसतो. त्यांचे शब्द तहट्टी म्हणतो. दुष्कृतात मिच्छामि दुक्कडम म्हणतो, प्रतिक्रमणासाठी इच्छामी म्हणत परवानगी घेतो इ. जेव्हा ती सम्यक पौषध करतो तेव्हा दहा वार्ताहर असतात.

* **सत्ताविसाव्या (२७)** अध्ययनात गर्गमुनिंच्या बिनधास्त शिष्यांचे दुष्ट बैलांच्या अनियंत्रित स्वभावाचे चित्रण करण्यात आले आहे. संघराज्य व्यवस्थेसाठी शिस्तीचे पालन आवश्यक आहे. ह्या अध्ययनात गुरु-शिष्याचे वर्णन आले आहे.

**अठ्ठाविसाव्या (२८)** अध्ययनात मोक्ष मार्गचे उल्लेख आले आहे. मोक्ष मार्गाचे चार भाग सांगितले आहे. ज्ञान, तत्वज्ञान, वर्ण, दृढता-तप.

**(१) ज्ञान** :- सम्यज्ञानाच्या सूत्रीकरणात ज्ञानाचे पाच प्रकार असून त्यातील ज्ञानाचे पाच प्रकार असून, त्यातील जाणता पदार्थ, गुण, समानार्थी शब्द आणि सहा पदार्थ मांडले आहेत. (नंदी सूत्रात पाचही ज्ञानाचे वर्णन आहे.)

**(२) दर्शन** :- तत्वज्ञानाचे ज्ञानाने ओळखल्या जाणाऱ्या सजीवांच्या नऊ घटकांवर विश्वास, सम्यग्दर्शन, निसर्ग, नियम, आदेश, सूत्र, बीज, प्रवेश, विस्तार क्रिया, संक्षिप्तता, धर्म रूची इ. दहा आवडी जो सम्यग्दर्शनाला बळ देतो.

**(३) वर्ण-चारित्र्य** :- जे आत्माला कर्मापासून रिकामे करते, ते सम्यक चरित्र, त्याचे साम्यिक असे पाच प्रकार सांगितले आहे.

**(४) तप** :- तपस्वी पूर्वी संचित कर्मांना जाळून टाकते आणि त्यांना शून्य करते. अशा तपस्याचे सहा प्रकार बाहेरून आतून सांगितले आहे.

मोक्षाचे चार मार्ग आहेत, सम्यज्ञान, सम्यग्दर्शन, सम्यगाचरित्र, म्यागताप परंतु मोक्षाचा मार्ग एकच आहे. हे चार ह्याचे भाग आहेत. चार भेद नाहीत. अशा प्रकारे तीर्थंकरांनी ह्या अध्ययनात सांगितले आहे.

– सौ. सविता चोरडिया





अंगणवाडी सेविकेवर अमानुष अत्याचार करून निर्घुण खून करणाऱ्या आरोपीला तात्काळ फाशीची शिक्षा द्या या मागणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करून निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्रकुमार पाटील यांना निवेदन देताना चिचोंडी पाटील येथील ग्रामस्थ.

# अंगणवाडी सेविकेवर अमानुष अत्याचार करून निर्घुण खून करणाऱ्या आरोपीला तात्काळ फाशीची शिक्षा द्या

### अंगणवाडी सेविका व ग्रामस्थांच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने

नगर – चिचोंडी पाटील येथील नंदी मारुती वस्ती, येथे अंगणवाडी सेविका यांच्यावर मानवतेला काळीमा फासणारी घटना घडली असून सौ. उमा महेश पवार या अंगणवाडी सेविका यांच्यावर अंगणवाडीमध्ये अमानुष अत्याचार करून त्यांचा निर्घृण खून केला व तसेच पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न केला सदर घटनेमुळे चिचोंडी पाटील व परिसरामध्ये असुरक्षितेचे वातावरण तयार झाले आहे. महिलांच्या सुरक्षितेचा प्रश्न तीव्र स्वरूपात निर्माण झाला असून संपूर्ण गावाच्या व ग्रामस्थांच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शन करून निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्रकुमार पाटील यांना निवेदन देण्यात आले. यावेळी सरपंच शरद पवार, प्रकाश पोटे, माजी सभापती प्रवीण कोकाटे, उपसरपंच सौ. यशोदा कोकाटे, योगीराज गाडे, अरुण म्हस्के, चंदू पवार, प्रशांत कांबळे, मच्छिंद्र खेडकर, वैभव कोकाटे, संतोष खराडे, भाऊसाहेब ठोंबरे, अंगणवाडी संघटनेच्या सचिव स्मिता सप्रे, औटी मॅडम, अंगणवाडी सेविका नंदा पवार, अशा चांदगुडे, दौपदी कोकाटे, नंदा ससे, सुरेखा खेडकर, मंदा कळमकर, किरण खराडे, आशा ठोंबरे, मंगल शेंदूरकर, लता मुटकुटे, अनिता इंगळे, सरस्वती कोकाटे, अलका तनपुरे, कमल पवार आदीसह चिचोंडी पाटील येथील अंगणवाडी सेविका व ग्रामस्थ उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे की, सदर घटनेचे गांभीर्य लक्षात घेता खटला फास्टट्रॅक कोर्टात चालून पीडित महिलेच्या वतीने सरकारी वकील उज्वल निकम यांची नेमणूक करण्यात यावी व सदर सहा महिन्यात आरोपीला फाशीची शिक्षा तत्काळ भवी यासाठी शासनाने विशेष प्रयत्न करावे तसेच पीडित कुटुंबाची जबाबदारी ही शासनाने घेऊन कुटुंबातील लहान दोन मुलांचे शिक्षण व पालन पोषणासाठी विशेष बाब म्हणून निधी तत्काळ उपलब्ध करून द्यावा. मयताचे पती हे नगर जिल्हा परिषद सेवेत कंत्राटी पद्धतीने कर्मचारी म्हणून काम करत असून त्यांना शासकीय सेवेत नियमित करावे तसेच जिल्ह्यातील सर्व अंगणवाडी केंद्रासाठी सेविका व मदतनीस दोन्ही पदाची मिनी अंगणवाडीसाठी तात्काळ नियुक्त करून सर्व अंगणवाडी केंद्रात विद्युत पुरवठ्यासह सीसीटीव्ही कॅमेरे व आलाराम बसवण्यात यावे. जिल्ह्यातील सर्व अंगणवाड्या मधील रिक्त पदे तात्काळ भरण्यात यावे व लाभार्थी पुरुष पालकांनी अंगणवाडी केंद्रामध्ये आपल्या पाल्याचा पोषण आहार नेण्यासाठी येऊ नये, महिलांना पाठवावे याबाबत आदेश काढण्यात यावे तसेच गावामध्ये बाहेरील तालुक्यातील जिल्ह्यातील परप्रांतीय अनोळखी व्यक्ती कामासाठी व इतर कारणासाठी राहायला आल्यास पोलीस प्रशासनाकडून त्याचे चारित्र्य पडताळणी होण्याची आवश्यकता होण्यासाठी गावातील अनेक वर्षां पासून बंद असलेली पोलीस चौकी ही लवकरात लवकर चालू व्हावी अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

# विश्व हिंदू परिषदेच्यावतीने वसुबारसनिमित्त सामुदायिक गौमाता पुजन



आगरकर मळा येथे विश्व हिंदू परिषदेच्यावतीने वसुबारसनिमित्त सामुदायिक गोमाता पूजन करताना माजी नगरसेविका सौ. गीतांजली काळे, विरेंद्र शिंदे आदी.

नगर – दीपावली सणाच्या पूर्वसंध्येला वसुबारस निमित्त आगरकर मळ्यामध्ये विश्व हिंदू परिषद अहिल्यानगर च्या वतीने गोमाता पूजन करून वसुबारस उत्साहात साजरी करण्यात आली.

याप्रसंगी आगरकर मळा, गाडळकर मळा प्रखंड मंत्री वीरेंद्र शिंदे, विश्व हिंदू परिषदेचे जिल्हा सहमंत्री शरदराव नगरकर, शिवनेरी प्रभात शाखेचे कार्यवाह डोलारे, सौ.वासंती नगरकर, मीरा महाजनी, माजी नगरसेविका गीतांजली काळे, सागर गाडळकर आदी उपस्थित होते.

गोमातेला हिंदू धर्मात अनन्यसाधारण महत्व आहे. वसुबारसच्या दिवशी गाईची पाडव्यासह संध्याकाळी पूजा करतात. घरांत लक्ष्मीचे आगमन व्हावे. या हेतूनेही या दिवशी सवत्स धेनूची पूजा करण्याची पद्धत आहे. वसु म्हणजे द्रव्य (धन) त्यासाठी असलेली बारस म्हणजे द्वादशी म्हणून या दिवसाला गोवत्स द्वादशी असेही म्हणतात. असे मिरा महाजनी यांनी गोमातेचे महत्त्व व हिंदू धर्म सनातन धर्माचे महत्त्व विषद केले. प्रास्ताविक सौ. वासंती नगरकर यांनी केले. तर आभार वीरेंद्र शिंदे यांनी मानले.

# स्नेहबंध फौंडेशनतर्फे जिल्हास्तरीय किल्ले बनवण्याची स्पर्धा – २०२४

नगर – दिवाळीत किल्ले बनवण्याची परंपरा जपण्याच्या उद्देशाने येथील स्नेहबंध सोशल फौंडेशनच्या वतीने जिल्हास्तरीय किल्ले बनवा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांनी दिली.

दिवाळीत लहान मुले एकत्र येऊन विविध किल्ले साकारतात. लहान मुलांच्या कल्पकतेला वाव देणाऱ्या आणि आपल्या इतिहासाबद्दल जागरुकता निर्माण करणाऱ्या या उपक्रमाला चालना देण्यासाठी या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

ज्यांना या स्पर्धेत सहभाग घ्यावयाचा आहे, त्यांनी आपले पूर्ण नाव, पत्ता व मोबाईल नंबरसह ३ नोव्हेंबर पर्यंत ८७९३ १९१९१९ या क्रमांकावर मोबाइलवर काढलेला १ मिनिटाचा व्हीडिओ व २ ते ३ फोटो पाठवावे. (जुना व्हिडिओ चालणार नाही.) किल्ला दगडमातीचा असावा, पण सजावटीकरता अन्य वस्तू व रंग वापरता येतील.

इकोफ्रेंडली किल्ला असल्यास त्यालाही विशेष गुण दिले जाणार आहेत. डॉ. उद्धव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली समिती परीक्षण करून पहिल्या तीन स्पर्धकांना पाहुण्यांच्या उपस्थितीत दिवाळी झाल्यानंतर गौरवण्यात येणार आहे. मागील विजेत्या स्पर्धकांना प्रवेश मिळणार नाही.

# 'स्वच्छ दिवाळी- शुभ दिवाळी व माझी वसुंधरा अभियान अंतर्गत फटाक्यांबाबत जाहीर आवाहन'

नगर – महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांची अधिसूचना MPCB / JD / (APC)/ TB/B-००७३ ३-१०-२०२४ नुसार जास्त आवाज निर्माण करणाऱ्या / वायू प्रदूषण करणाऱ्या फटाक्यांची निर्मिती, विक्री किंवा वापर करण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. अशा फटाक्यांचे उत्पादन विक्री किंवा वापर बेकायदेशीर आहे. तसेच आपणास सर्वांना माहितच आहे की, आपण वातावरणीय बदलास सामोरे जात आहोत. वातावरणीय बदलाच्या अनेक कारणांपैकी हवेचे प्रदूषण हे एक महत्वाचे कारण आहे. विविध सण / उत्सव प्रसंगी आपण वाजवत असलेल्या फटाक्यांमध्ये कार्बन व सल्फरचे प्रमाण अधिक असते. जे विषारी वायूंची श्रेणी तयार करतात. हे वायू वनस्पती, पक्षी, प्राणी तसेच मानवी प्रजातीस हानी पोहचवितात. हवेचे प्रदूषण थांबविण्याची क्रिया आपण स्वतःपासून सुरू करू शकतो. सबब माझी वसुंधरा अभियान व स्वच्छ सर्वेक्षण २०२४- २५ अंतर्गत येणाऱ्या सण / उत्सवात फटाके वाजविण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे. तरी सर्व नागरिकांनी याची अंमलबजावणी करावी असे आवाहन महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने करण्यात येत आहे.

येणारी दिवाळी स्वच्छ दिवाळी- शुभ दिवाळी हरित पर्यावरणपूरक म्हणून साजरी करूयात.

# जयआनंद फौंडेशनने गोवात्सलचे शिल्प उभारून गोसंवर्धनाचा चांगला संदेश दिला

### राज्य गोसेवा आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा, अहिंसा चौकात स्वागत



राज्य गोसेवा आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा अहिल्यानगरमध्ये आले असता त्यांचे जय आनंद फाउंडेशनच्या वतीने अहिंसा चौकात स्वागत करताना आ.संग्राम जगताप व फौंडेशनचे कमलेश भंडारी.

नगर – राज्य सरकारने गोसेवा आयोगाची स्थापना करून देशी गोमातेला नुकताच राज्य मातेचा दर्जा दिला आहे. त्यामुळे आयोगाच्या माध्यमातून देशी गायींचे संरक्षण व संगोपन होणार असून कमी होणाऱ्या देशी गायींची संख्या वाढण्यासाठी काम होत आहे. आता गोमातेला राष्ट्रमातेचा दर्जा मिळावा यासाठी प्रयत्नशील आहोत. अहिल्यानगर मध्ये देशी गायींचे जास्तीत जास्त संगोपनासाठी जय आनंद फाउंडेशन सारख्या सामाजिक संस्थानी व युवकांनी या कार्यात सहभागी व्हावे. जयआनंद फाउंडेशन गोवात्सलचे शिल्प उभारूण गोसंवर्धनाचा चांगला संदेश दिला आहे, असे प्रतिपादन राज्य गोसेवा आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा यांनी केले.

राज्य गोसेवा आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा अहिल्यानगरमध्ये आले असता जय आनंद फाउंडेशनच्या वतीने आनंदधाम रोडवरील अहिंसा चौक येथे आ.संग्राम जगताप यांनी त्यांचे स्वागत करून सत्कार केला. अहिंसा चौकात उभारण्यात आलेल्या गोमातेच्या शिल्पाचे शेखर मुंदडा यांनी कौतुक केले.

यावेळी फाउंडेशनचे संस्थापक कमलेश भंडारी, आदेश चंगेडीया, अध्यक्ष अमित काबरा, उपाध्यक्ष कुणाल बडजाते, गौतम मुथा, रोहित चुतर, मिनेश छाजेड, सुदर्शन दिवटे, सीए.किरण भंडारी, रितेश पारख, मनीष फूलडहाळे, करण भळगट, पवन झंवर, सुमीत लोढा, विनोद कटारिया आदींसह सदस्य उपस्थित होते.

आ.संग्राम जगताप म्हणाले, गोमाते मध्ये ३३ कोटी देवांचे वास्तव्य असल्याने गोमाता आपल्याला ईश्वरासमान आहे. पण हे गोधन कमी होत आहे. त्यामुळे देशी गायींचे संवर्धन करणाऱ्या गोशाळांना सर्वांनी सहकार्य करावे. राज्य गोसेवा आयोगाच्या माध्यमातून अध्यक्ष शेखर मुंदडा पूर्ण राज्यात खूप उत्कृष्ट काम करत आहेत. या भागाचे जय आनंद फाउंडेशनने अहिंसा चौक नामकरण करून गोमातेचे शिल्प उभारून या भागाचे सौंदर्य वाढवले आहे.

प्रास्ताविकात कमलेश भंडारी म्हणाले, शेखर मुंदडा यांनी अहिंसा चौकस भेट दिल्याने फाउंडेशनच्या कार्याला प्रोत्साहन मिळणार आहे, असे सांगून फौंडेशनच्या कार्याची माहिती देवून गो मातेच्या शिल्प उभारण्यासाठी केलेल्या सहकार्याबद्दल संग्राम जगताप यांचे आभार मानले.


## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्टात नमुद केलेली मिळकत विद्यमान मालक सौ. अमृता जयंत राठोड, रा. २२९ चौपाटी कारंजा, अहमदनगर. यांचे मालकी हक्काची व वहिवाटीची असुन विद्यमान मालक यांनी सदर मिळकतीचे व्यवहार करुन साठेखत करुन आमचे अशिलांबरोबर कायमखुष खरेदी देण्यांचे ठरविले असुन विसाराची रक्कम देखील स्वीकारलेली आहे. सदर मिळकत ही निर्वेध निजोखमी व बोजारहीत, असल्याची विश्वास व भरवसा आमचे अशिलांस दिलेला आहे.

या उपरही सदर मिळकती बाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारे मालकी हक्क, हितसंबंध, ताबा, मनाई,दावा,लिज, गहाण, दान, बक्षिस, पोटगी हक्क, सोसायटी राईटस व इतर कोणतेही हक्क हितसंबंध असल्यांस त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन ७ दिवसांचे आत खालील दिलेल्या पत्यावर संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिले आहे असे समजण्यांत येईल.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन - जिल्हा अहमदनगर, पोटतुकडी नगरपैकी, अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील मौजे नालेगाव येथील सर्व्हे नंबर १७/८ व १७/९ यापैकी प्लॉट नं. ६१ते ६६ याचे एकुण क्षेत्र १४६.७६ चौ.मी. यापैकी बिनशेती प्लॉट नं६४ याचे क्षेत्र २४.४६ चौ. मी. बिनशेती प्लॉट नं६५ याचे क्षेत्र २४.४६ चौ. मी. असे एकुण क्षेत्र ४८.९२ चौ. मी. प्लॉट मिळकतीबाबत.**

**प्लॉट नं.६४ यासी चतु:सिमा-**
पुर्वेस – प्लॉट नं.६३ | दक्षिणेस – ४.५ मीटर रुंद रस्ता
पश्चिमेस – प्लॉट नं. ६५ | उत्तरेस – प्लॉट नं.५७

**प्लॉट नं.६५ यासी चतु:सिमा-**
पुर्वेस – प्लॉट नं.६४ | दक्षिणेस – ४.५ मीटर रुंद रस्ता
पश्चिमेस – प्लॉट नं. ६६ | उत्तरेस – प्लॉट नं.५६

येणेप्रमाणे चतुः सिमापुर्वक काही एक राखुन न ठेविता.

दि. २९/१०/२०२४
अहमदनगर.

ॲड. नाजिम अहमद इस्माईल शेख
ॲड. कुरेशी फैजान फारुक
जुन्या कलेक्टर ऑफीस जवळ, डावरेगल्ली, अहमदनगर
मो. ९८८१४३१८६० / ७२७६२५२४७८




दिवाळी निमित्त श्री महावीर प्रतिष्ठान ट्रस्टच्या वतीने मंदिरा बाहेर जे गरजू आणि गरीब लोक असतात दिवाळी फराळ व मिठाई करण्यात आले

# महावीर प्रतिष्ठानतर्फे गरिबांना फराळ व मिठाई वाटप

नगर – मार्केटयार्ड येथील आनंदऋषीजी समाधी जवळ, माळीवाडा व दिल्लीगेट येथील शनी मंदिराबाहेर, रेल्वेस्टेशन बाहेर बसणाऱ्या गरीब लोकांना फराळ व मिठाई वाटप करण्यात आले. यावेळी श्री महावीर प्रतिष्ठान ट्रस्ट प्रतिष्ठानचे अध्यक्ष हर्षल बोरा, उपाध्यक्ष राकेश भंडारी, प्रसाद बोरा, सेक्रेटरी अक्षय मुनोत, सह सेक्रेटरी आशिष गुंदेचा, खजिनदार आशिष चोपडा, स्वप्निल मुनोत, अमित फिरोदिया, रितेश पारख, अमोल निस्ताने, श्रीपाल शिंगी, नितेश कटारिया, पुष्कर तांबोळी, चेतन भंडारी, निखिल गांधी, रोहित गांधी, सुजित कटारिया, आशिष गुंदेचा, रोहन बोरा आदी उपस्थित होते

या उपक्रमासाठी प्रतिष्ठानच्या सर्व सदस्य व पदाधिकाऱ्यांनी मेहनत घेतली. उपक्रमासाठी अनेकांचे सहकार्य मिळत आहे.

# परवानगी नसताना इंग्रजी माध्यमाच्या शाळेत भरविले जाते माध्यमिकचे वर्ग

### कारवाई करा, अन्यथा शाळेला टाळे ठोकू

नगर – केडगाव, अंबिकानगर येथील सीबीएससी पॅटर्नच्या इंग्रजी माध्यम शाळेला प्राथमिक व माध्यमिकची मान्यता नसताना देखील विद्यार्थ्यांकडून आर्थिक लूट सुरु असल्याचा आरोप करुन रिपब्लिकन युवा सेनेच्या वतीने शाळेवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. संघटनेचे जिल्हा संघटक मेहेर कांबळे यांनी याबाबतचे निवेदन जिल्हा परिषद प्राथमिक व माध्यमिकचे शिक्षणाधिकारी व मनपा शिक्षण मंडळाचे प्रशासनाधिकारी यांना दिले आहे.

केडगाव येथील अंबिकानगर मध्ये सीबीएससी पॅटर्नची इंग्रजी माध्यमची शाळा असून, त्याला फक्त पूर्व प्राथमिकची परवानगी आहे. सदर कॉलनीमध्ये स्थानिक रहिवासी मोठ्या संख्येने राहतात. अशा रहदारीच्या ठिकाणी बेकायदेशीर रित्या माध्यमिक वर्ग भरवले जातात. सदर शाळेच्या आवारात पुरुष कर्मचारी कार्यरत असून, त्यांच्याकडून कोणत्याही प्रकारचे चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र घेण्यात आलेले नाही. शाळा चालवणारे कुटुंब शाळेच्या परिसरात वास्तव्यास आहे. धुळीतच लहान मुलांना जेवणासाठी बसविले जाते आहे. सदर शाळेत तक्रार पेटी नाही, सखी सावित्री समितीचा फलक नाही, डीएड, बीएड पदवीधारक असलेले कुशल शिक्षक नाही, मुलांसाठी प्रशस्त मैदान नाही, स्वच्छतागृहाची कमतरता आदी अनेक त्रुटीचा समावेश असल्याचे निवेदनात म्हंटले आहे.

मुलांच्या आरोग्याशी व जीवनाशी खेळ सुरु आहे. माध्यमिक वर्गाला परवानगी नसता देखील विद्यार्थ्यांकडून फी वसुल करुन वर्ग भरविले जात आहे. सदर शाळेवर कठोर कारवाई करून शाळेची असलेली मान्यता रद्द करण्याची मागणी करण्यात आली आहे.

शिक्षणाच्या नावाखाली पालकांची लूट केडगावमध्ये सुरु आहे. त्या इंग्रजी शाळेला फक्त पूर्व प्राथमिकची मान्यता असून, पैसे लाटण्यासाठी इयत्ता दहावी पर्यंत वर्ग भरविले जात आहे. हा विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळण्याचा गंभीर प्रकार आहे. तातडीने शिक्षण विभागाने संबंधीत शाळेवर कारवाई करावी. अन्यथा रिपब्लिकन युवा सेनेच्या वतीने शाळेला टाळे ठोकून आंदोलन केले जाणार असे मेहेर कांबळे यांनी म्हटले आहे.

